

राज्यात काटकसर अभियान

पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 10 ● 16 मे 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# बंगालच्या नव्या युगाचा प्रारंभ



## अध्यक्षीय मनोगत

# गंगोत्री ते गंगासागर - सर्वत्र भाजपा

पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पार्टीचा विजय सर्व कार्यकर्त्यांसाठी मोठा भावनात्मक क्षण आहे. याचे कारण भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची पश्चिम बंगाल ही जन्मभूमी. जनसंघापासून भारतीय राजकारणात राष्ट्रवादी विचारांचा प्रवास सुरू झाला. हा प्रवास आता गंगोत्री ते गंगासागरपर्यंत म्हणजे देशाच्या उत्तर टोकापासून पूर्व टोकापर्यंत पसरला गेला आहे. डॉ. मुखर्जी यांचा भारतीय राजकारणातील उदय हिंदुत्ववादी विचारधारेतून झाला होता. जम्मू-काश्मीरसाठी स्वतंत्र घटना, स्वतंत्र ध्वज देण्याच्या पंडित नेहरू सरकारच्या निर्णयाला डॉ. मुखर्जी यांनी प्रखर विरोध केला होता. त्यासाठी ते काश्मीरमध्ये आंदोलनासाठी गेले होते. काश्मीरमध्ये त्यावेळच्या शेख अब्दुल्ला सरकारने डॉ. मुखर्जी यांना अटक केली होती. अटकेमध्ये असतानाच डॉ. मुखर्जींचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला. देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या डॉ. मुखर्जी यांच्या भूमीत रूजण्यासाठी जनसंघ आणि भारतीय जनता पार्टीला प्रचंड संघर्ष करावा लागला. या संघर्षाचे फळ ४ मे २०२६ रोजी दणदणीत विजयाच्या रूपाने मिळाले. त्यामुळेच आपल्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी हा विजय भावनात्मक आहे. या विजयामागची अनेक कारणे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न या अंकात करण्यात आला आहे.

इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय चलनाची बचत करण्यासाठी देशवासियांना इंधनाचा वापर काळजीने करण्याचे आवाहन केले आहे. मोदी सरकारने युद्धाच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना इंधन दरवाढीची झळ बसू नये, यासाठी मोठे प्रयत्न केले. जगभरातील जवळपास सर्व राष्ट्रांमध्ये पेट्रोल, डिझेलचे भाव वाढले होते. मात्र भारतात गेले दोन महिने पेट्रोल, डिझेलचे भाव वाढले नव्हते. 'मनोगत'च्या या अंकात देश अर्थकारणावर इंधनाच्या किमतीचा कसा परिणाम होणार आहे, याचा सोप्या भाषेत आढावा घेण्यात आला आहे. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहानाचे महत्व सामान्य माणसाला समजावून सांगण्यासाठी ही माहिती प्रत्येक कार्यकत्याने आवर्जुन वाचली पाहिजे. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून आपण सर्व कार्यकर्ते सामान्य जनतेपर्यंत सतत जात असतो. अनेकदा सामान्य माणूस आपल्याला सरकारच्या धोरणांबाबत प्रश्न विचारत असतो. अशावेळी सरकारच्या धोरणामागची आणि निर्णयामागची दृष्टी, या निर्णयाचे होणारे चांगले परिणाम कार्यकर्त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. सरकारी धोरणांचे चांगले परिणाम व त्यातून सामान्य माणसाला होणारा फायदा याची माहिती कार्यकर्त्यांनी नागरिकांना दिली पाहिजे. हल्ली समाज माध्यमांमधून सरकारच्या निर्णयाबद्दल अनेक अफवा पसरवून सामान्य माणसाच्या मनात गैरसमज निर्माण करण्याचे काम विरोधकांकडून सातत्याने केले जात आहे. विरोधकांचा हा अपप्रचार खोडून काढण्याची जबाबदारी तुम्हा-आम्हा कार्यकर्त्यांची आहे. त्यासाठी 'मनोगत'मधील लेख, माहिती कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनीही जाणून घेतली पाहिजे. सरकारची अनेक चांगली कामे जनतेपर्यंत जात नाहीत, असा अनुभव अनेकदा येतो. त्यासाठी कार्यकर्त्यांनी अत्यंत सजग राहणे आवश्यक बनले आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर


विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

विकास, प्रगती आणि शांततेच्या युगाचा प्रारंभ ०४



विजयामागचा प्रमुख चेहरा ०६



आशीर्वाद देणारे हात ०९




जंगलराज संपले ११



पश्चिम बंगालमधील बांगलादेशी घुसखोरांवर सर्जिकल स्ट्राईक १३



ममतांना लढा देणारा झुंजार नेता १७



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# विकास, प्रगती आणि शांततेच्या युगाचा प्रारंभ



सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीच्या मंत्रिमंडळाने पश्चिम बंगालचा राज्यकारभार सुरू केला आहे. पश्चिम बंगालमधील सत्तांतर अनेक अर्थानी महत्वपूर्ण ठरणार आहे. देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हे सत्तांतर अत्यावश्यक होते.

**देशातील** अन्य राज्यांपेक्षा पश्चिम बंगाल, ईशान्येकडील ७ राज्ये, जम्मू-काश्मीर, पंजाब या राज्यांना मोठे भू राजकीय महत्व आहे. त्यामुळे ही राज्ये राज्य कारभाराच्या दृष्टीने कमालीची संवेदनशील आहेत. पंजाब आणि काश्मीरमधील दहशतवाद भारतीयांनी अनेक वर्षे सहन केला. या दहशतवादाचे अनेक अनिष्ट परिणाम भारतीयांनी सहन केले. भारतीय लष्कराच्या आणि सुरक्षा दलांच्या बहादुरीमुळे पंजाब आणि काश्मीरमधील दहशतवाद्यांचे हिंसाचाराचे अनेक प्रयत्न हाणून पाडले गेले. पश्चिम बंगाल हे राज्य बांगलादेशच्या सीमेवर आहे. ब्रिटिशांनी हिंदू आणि मुस्लिमांमध्ये फूट पाडल्यामुळे बंगालची फाळणी झाली. फाळणीनंतर पाकिस्तानच्या वाट्याला पश्चिम बंगालचा शेजारी बांगलादेश आला. या बांगलादेशातून आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी होते. हे घुसखोर भारताच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेसाठी धोका बनत चालले आहेत. मात्र या घुसखोरांना रितसर भारताचे नागरिकत्व




देण्याचे पाप ममता बॅनर्जींच्या काळात पश्चिम बंगालमध्ये झाले. आसाममध्ये काँग्रेसची दीर्घकाळ सत्ता होती. त्या काळात काँग्रेसने बंगाली घुसखोरांना पायघड्या घातल्या. एकेकाळी मार्क्सवादी कम्युनिस्टांविरुद्ध ममता बॅनर्जींनी बांगला घुसखोरांच्या मुद्यावरून मोठे आंदोलन केले होते. मात्र याच ममता बॅनर्जींनी आपली सत्ता टिकवण्यासाठी कम्युनिस्टांनाही मागे टाकत आधार कार्ड देत घुसखोरांना भारतीय नागरिकत्व बहाल करण्याचे पातक केले. याखेरीज ममता बॅनर्जी सरकारच्या आशीर्वादामुळे मुस्लिम गुंडांनी अक्षरशः हैदोस माजवला होता. संदेशखाली येथे शाहजहां शेख आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी महिलांवर केलेले अत्याचार आणि गुंडगिरीच्या बळावर जमिनी बळकावण्याच्या घटना संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या होत्या. त्यावेळी महिलांनी ममता सरकारविरुद्ध मोठे आंदोलन केले होते. त्यानंतर दोन वर्षीपूर्वी पश्चिम बंगालच्या राजधानीत कोलकाता येथे आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालयात एका प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर पाशवी बलात्कर करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेने पश्चिम बंगालमधील महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. ममता सरकारने बलात्काराच्या या घटनेतील आरोपींना शासन करण्याऐवजी पाठिशी घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे संपूर्ण राज्यात ममता बॅनर्जींविरोधात संतापाची लाट उसळली. पश्चिम बंगालमधील निकाल जाहीर झाल्यानंतर तेथे मुस्लिम गुंडांमुळे हिंदू महिला किती असुरक्षित बनल्या होत्या, हे कथन करणाऱ्या अनेक महिलांच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. ममता बॅनर्जींनी आपल्या पक्षातील गुंड आणि जिहादींच्या मदतीने पश्चिम बंगालमध्ये 'दहशतराज' स्थापन केले होते. या दहशतीविरोधात ब्र काढण्याची सामान्य माणसाची हिंमत होत नव्हती. २०२१ मध्ये भारतीय जनता पक्ष ममता बॅनर्जींच्या विरोधात मैदानात उतरल्यानंतर ममता सरकारने आणि तृणमूलच्या गुंडांनी भाजपा कार्यकर्ते आणि समर्थकांवर प्रचंड अत्याचार केले. गेल्या ५ वर्षात पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पार्टीच्या ३२१ कार्यकर्त्यांच्या हत्या करण्यात आल्या आहेत. कम्युनिस्ट आणि काँग्रेसने ममता बॅनर्जीविरोधात लढणे सोडून दिल्यानंतर भारतीय जनता पार्टी पश्चिम बंगालमधील प्रमुख विरोधी पक्ष बनला. गेल्या ५ वर्षात ममता सरकार आणि तृणमूल गुंडांकडून होणारे अनन्वित अत्याचार सहन करत भाजपा कार्यकर्त्यांनी तृणमूल विरोधातील लढा निर्धाराने चालू ठेवला. पापांचा घडा भरल्यावर अनेक शक्तिशाली पराभूत झाल्याचे रामायण, महाभारतात आणि प्रत्यक्षातही आपण अनेकवेळा पाहिले आहे. ममता बॅजर्नींच्या पापांचा घडा काठोकाठ भरल्यामुळे मतदारांनी त्यांना या निवडणुकीत धडा शिकवला. अर्थात हे सत्तांतर घडवणे मुळीच सोपे नव्हते. उत्तर प्रदेश, बिहार यासारख्या राज्यांमध्ये असलेल्या गुंडगिरीची, दहशतीची राष्ट्रीय नव्हे आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा झाली होती. आता या दोन राज्यांमधील स्थिती पूणपणे बदलली आहे, ही गोष्ट वेगळी. मात्र उत्तर प्रदेश आणि बिहारलाही मागे टाकेल अशी गुंडगिरी पश्चिम बंगालमध्ये चालू आहे, याची कल्पना उर्वरीत भारतीयांना नव्हती. पश्चिम बंगालमधील गुंडगिरीच्या थैमानाविरोधात प्रसारमाध्यमांनी मौन बाळगले होते. ही गुंडगिरी मोडून काढली जाईल, असा विश्वास कोणाला वाटत नव्हता. त्यामुळे या गुंडगिरी वरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत कोण करत नव्हते. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने ममतांविरुद्ध उभे राहण्याची ताकद जनसामान्यांना दिली. ममतांच्या पाडावानंतर संपूर्ण राज्यभर जो जल्लोष झाला तो पाहता ममतांच्या गैरकारभाराला सामान्य माणूस किती विटला होता, हे कळून आले. सुवेंदू अधिकारींच्या राज्यारोहणामुळे पश्चिम बंगालमधील विकास, प्रगती आणि शांततेच्या युगाचा प्रारंभ झाला आहे. ■

# विजयामागचा प्रमुख चेहरा



● **रवींद्र अनासपुरे**, प्रभारी - प्रदेश मुख्यालय

> पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या दणदणीत विजयामागची कारणे अनेक पत्रकार, राजकीय विश्लेषक या मंडळींनी कथन केली आहेत. २०२१ मध्ये भारतीय जनता पार्टीला अपेक्षेइतके यश मिळाले नव्हते. मात्र त्या निवडणुकीत भाजपाची विधानसभेतील सदस्य संख्या ३ वरून ७७ पर्यंत गेली होती. डावी आघाडी आणि काँग्रेसला बाजूला सारत भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगालमधील प्रमुख विरोधी पक्षाची जागा पटकावली होती.

**२०२१ च्या** निकालानंतर राजकीय विश्लेषकांनी पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींना पराभूत करणे कदापि शक्य नाही, असा निष्कर्ष काढत भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाची यथेच्छ टिंगळटवाळी केली होती. ही टिंगळटवाळी भाजपाबद्दलच्या द्वेषातून, तिरस्कारातून झाली होती. भारतीय जनता पार्टीची कार्यपद्धती ज्यांना माहित आहे त्या निष्पक्ष राजकीय विश्लेषकांनी भारतीय जनता पार्टीच्या २०२१ मधील यशाचे कौतुक करताना पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पार्टी भविष्यकाळात मोठे यश मिळवेल, अशी शक्यता व्यक्त केली होती. अशा विश्लेषकांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी होती. अपयशातून आणि चुकांमधून सातत्याने शिकत जाण्याच्या वृत्तीमुळेच भाजपा आज जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे. यावेळच्या द्विशतकी कामगिरीमागे केंद्रीय गृहमंत्री व भाजपाचे माजी अध्यक्ष अमित शाह यांचे प्रयत्न अत्यंत मोलाचे होते. २०२१ मधील पराभवापासून धडे घेत अमित शाह यांनी प्रत्यक्ष मैदानावर उतरून त्याचबरोबर पडद्यामागे राहून पक्षाची रणनिती आखणे, या रणनितीनुसार पक्षातील नेते आणि पदाधिकाऱ्यांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवणे, ही रणनिती प्रत्यक्षात येत आहे ना याकडे बारकाईने लक्ष




ठेवणे अशा अनेक भूमिका निभावल्या. २०२१ च्या निकालानंतर पक्षाच्या कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले झाले. ३०० हून अधिक कार्यकर्ते तृणमूलच्या हिंसाचारात ठार झाले, तृणमूलच्या गुंडांनी भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांची घरे जाळली. तृणमूलविरोधात काम करण्याची कोणाची हिंमत होऊ नये, या हेतूनेच हा हिंसाचार घडवला गेला होता. अमितभाईंनी राज्यभरातील कार्यकर्त्यांशी नियमित संपर्क साधत त्यांचे मनोधैर्य कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. तृणमूलच्या गुंडांची दहशत मोडून काढण्यासाठी सरकारी पातळीवर योग्य त्या हालचाली केल्या. जाहीर सभांमधून तृणमूलची गुंडगिरी कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, याची समज योग्य त्या भाषेत दिली. देशाचा गृहमंत्री आपल्यामागे उभा आहे, याची जाणीव कार्यकर्त्यांना होती. याचा योग्य तो संदेश सामान्य मतदारांपर्यंतही पोहचला. १५ दिवस अमितभाई पश्चिम बंगालमध्ये ठाण मांडून बसले होते. कोलकाता येथे असलेल्या वॉररूममध्ये जाऊन अमितभाईंनी तेथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. त्याचबरोबर तेथून होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. अमितभाईंसारखा नेता एवढी प्रचंड मेहनत घेत आहे, हे दिसत असल्यामुळे कार्यकर्ते आणि पदाधिकारी दुप्पट जोमाने कामाला लागले.

भारतीय जनता पार्टी नेहमीच विजयी का होते, याचे उत्तर अमितभाईंसारख्या अनेक वरिष्ठ नेत्यांकडून, पदाधिकाऱ्यांकडून आणि सामान्य कार्यकर्त्यांकडून घेतली जाणारी अफाट मेहनत हे आहे. २००४ ते २०१४ या काळात काँग्रेस केंद्रात सत्तेत होती. त्या काळात उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या अनेक महत्वाच्या राज्यांमध्ये निवडणुका झाल्या होत्या. मात्र भाजपा नेतृत्व आणि संघटनेने घेतलेले परिश्रम काँग्रेसच्या कोणाही नेत्याने, पदाधिकाऱ्याने घेतल्याचे आठवत नाही. संघटना वाढीसाठी मेहनत घेण्याची काँग्रेस नेतृत्वाची इच्छा नाही. त्यामुळेच उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा यासारख्या अनेक राज्यांमध्ये काँग्रेसचे नाममात्र अस्तित्व राहिले आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि उबाठाशी युती केल्यामुळे काँग्रेस ५ व्या क्रमांकावर आहे. भाजपाचे केंद्रातील मंत्री आणि राष्ट्रीय पदाधिकारी, विविध राज्यांचे मुख्यमंत्री संघटनेसाठी वेळ देतात, त्या पद्धतीने काँग्रेसचे नेते पक्ष संघटनेसाठी वेळ देत नाहीत. दोन्ही पक्षाच्या संस्कृतीमधील हा मोठा फरक आहे. अमितभाईंनी २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी पक्ष संघटनेची कशी बांधणी केली आणि मोदी लाटेचा फायदा पक्षाला कसा मिळवून दिला, हे साऱ्या देशाने पाहिले आहे. त्यावेळी तर केंद्रातही भाजपाची सत्ता नव्हती. निवडणूक रणनितीचा अभ्यास, प्रतिस्पर्धाचे कच्चे दुवे हेरणे, बूथ पातळीपर्यंत संघटन सक्रीय करणे हे निवडणुका जिंकण्याचे तंत्र आहे. अमितभाईंसारखे ज्येष्ठ नेते हे तंत्र कार्यकर्त्यांकडून, पदाधिकाऱ्यांकडून, लोकप्रतिनिधींकडून घोटवून घेतात. सरकारचे चांगले निर्णय लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी पक्षाची संघटना सातत्याने प्रयत्न करते. या सर्व घटकांचा एकत्रित लाभ भारतीय जनता पार्टीला निवडणुकांमध्ये होतो. अमितभाईंसारखे नेते मंत्रीपदाचा बडेजाव न करता पक्ष संघटनेसाठी कष्ट करतात. पक्षाला विजय मिळाल्यानंतरही अमितभाई त्याचे श्रेय घेण्यासाठी पुढे येत नाहीत. आपले काम प्रामाणिकपणे करत राहणे एवढेच त्यांना ठाऊक आहे. ■

# सूर्या मार्डी, राजेश सरकारसारख्या हजारो कार्यकर्त्यांच्या समर्पणाचा हा विजय आहे...




**पश्चिम** बंगालच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने अभूतपूर्व यश यावेळी मिळविले आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीतही वातावरण भारतीय जनता पार्टीला अनुकूल असून देखील भारतीय जनता पार्टी सत्तेत येऊ शकली नव्हती. पण तेव्हाच लक्षात आले होते की पुढील निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच विजय होणार आहे.

हा विजय पश्चिम बंगालमध्ये अत्यंत निष्ठेने प्रचंड प्रतिकूल परिस्थितीमध्ये खांद्यावरती भाजपचा झेंडा घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत बालूरघाट मतदार संघात सुमारे ३० दिवस मी व आमदार सुनील कांबळे यांनी ठिय्या मांडला होता. बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख यांच्या बैठका, यादी वाचन, कोण बाहेर गेले त्यांना आणण्याची व्यवस्था वगैरे सगळ्या यंत्रणा लावण्याचे काम आमच्याकडे होते. ते अतिशय योग्य पद्धतीने कार्यकर्ते करीत होते.

राजेश सरकार हा सामान्य कार्यकर्ता. पंचायत निवडणुकांमध्ये भाजपचे काम केले म्हणून तृणमूलच्या गुंडांनी जबरदस्त मारहाण केली होती. डोक्यावर अठरा टाके घेऊन तो घरी आला. त्याच रात्री त्याची छोटीशी झोपडी तृणमूलच्या गुंडांनी जाळली. जिव वाचवून कसेबसे घरातले बाहेर पडले. पण यावेळी विधानसभा निवडणुकीत पुन्हा राजेश सरकार १८ टाके डोक्यावरती मिरवीत भारतीय जनता पार्टीचे शक्ती केंद्रप्रमुख म्हणून काम करायला सज्ज होता.

सूर्या मार्डी नावाचा शक्ती केंद्रप्रमुख भेटला. स्वतः हमाली करणारा. हमाली बंद ठेवून भाजपच्या शक्ती केंद्रांचे काम तो करत होता. तृणमूलच्या गुंडांनी त्यालाही सोडले नव्हते. वस्तीत आरओ पाणी सगळ्यांना मोफत, पण भाजपचे काम करतो म्हणून पाणी सुद्धा त्याला विकत घ्यायला लागत होते. दीड लाख रुपयांची लालूच तृणमूलच्या गुंडांनी त्याला दाखवली. वरती चांगल्या रोजगाराची हमी भाजपचे काम सोडाव म्हणून दिली. याने सर्वांच्या तोंडावर सांगितले की अटलजींच्या प्रतिमेसमोर मी भाजपचे काम करण्याचा संकल्प केला आहे त्यांना तोंड दाखवायची वेळ येईल तेव्हा मी त्यांना काय सांगू? असे म्हणत ती ऑफर नाकारली. मग शेवटचा पर्याय प्रचंड मारहाण. सर्वत्र शरीरावरती असेच चार-पाच ठिकाणी सतरा अठरा टाके पडले पण तरी देखील पुन्हा विधानसभा निवडणुकीत सूर्या मार्डी हमाली बंद करून भाजपच्या कामात हिरीरीने सहभाग घेत होता.

अशा हजारो निष्ठावंत कार्यकर्त्यांची फौज पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या मागे उभी राहिली होती. या सगळ्या कार्यकर्त्यांना धीर देणारे, आपली सर्व प्रकारची बिरुद बाजूला ठेवून अनेक मान्यवर कार्यकर्ते कार्यरत होते. अशातलेच एक म्हणजे बालूरघाटचे उमेदवार, आताचे नीती आयोगाचे उपाध्यक्ष ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. अशोक लाहिरी हे होत. अशोक लाहिरींनी आपली सर्व बिरुद बाजूला ठेवून विधानसभा निवडणुकीत काम केले. अशा हजारो निष्ठावंत कार्यकर्त्यांना धीर दिला. त्यांच्या घरामध्ये, झोपड्यांमध्ये जाऊन त्यांच्याशी चर्चा केली. तिथे चहापान केले. त्यातून या कार्यकर्त्यांना बळ मिळत गेले. एक बौद्धिक अधिष्ठान या कामाला अशोकजींनी स्वाभाविकपणे कार्यकर्त्यांच्या मनात उत्पन्न केले. हे सर्व कार्य हिंदुत्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे अशा प्रकारची जाणीव अशोक लाहिरी यांनी संपूर्ण बालुरघाट मतदार संघ आणि विजयी झाल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे सभागृहाचे उपनेते म्हणून सातत्याने हजारो कार्यकर्त्यांसाठी केल. अशा सगळ्या निष्ठावंत, मार खाणाऱ्या, रक्त सांगणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बरोबरीने अशोक लाहिरींसारख्या या लढ्याला बौद्धिक अधिष्ठान मिळवून देणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांचे परिश्रम या विजयाच्या मागे आहेत.

**भारत माता की जय**

**- डॉ. श्रीपाद ढेकणे**

# आशीर्वाद देणारे हात



● राजेश कुलकर्णी

> सुवेंदू अधिकारी यांच्या शपथविधीपूर्वी व्यासपीठावर कृतज्ञतेचे वेगळेच नाट्य घडले. भाजपशासित विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि अन्य राजकीय नेते उपस्थित असलेल्या व्यासपीठावर कृश शरीरयष्टीचे एक वयस्कर गृहस्थ बसले होते. पंतप्रधान मोदींनी त्यांचा सत्कार केल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले की हे कोण! त्यांचा आताच्या निवडणुकीत भाजपला काही फायदा झाला असेल हेही संभवत नव्हते. तर मग खुद्द पंतप्रधानांनी त्यांचा सत्कार करण्याचे कारण काय?

**ते** होते माखनलाल सरकार. वय फक्त ९७. जनसंघाचे नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना जम्मू काश्मिरच्या सीमेवर अटक झाली तेव्हा ते केवळ २४-२५ वर्षांचे होते. डॉ. मुखर्जींच्या आंदोलनाबद्दल आणि वयाच्या केवळ बावन्नाव्या वर्षी त्यांचा अंत कसा घडवण्यात आला याबाबत फार कोणाला माहीत नसते. त्याबद्दल थोडक्यात सांगतो. नेहरूंच्या अनेक देशघातकी धोरणांपैकी एक म्हणजे जम्मू-काश्मीरला मिळालेला स्वतंत्र पंतप्रधान, स्वतंत्र राज्यघटना आणि स्वतंत्र ध्वज. त्यातच जम्मू काश्मीरमध्ये जाण्यासाठी भारतीयांना परवानगी घ्यावी लागे. भारतात 'दो प्रधान, दो विधान और दो निशान' चालणार नाहीत असे ठणकावून सांगत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जम्मू काश्मिरच्या सीमेवर धडकले. एरवी अशी परवानगी नसलेल्यांना सीमेवरूनच परत पाठवले जाई. मात्र पठाणकोटच्या पुढील माधोपुर चेकपोस्टवर डॉ. मुखर्जींना अटक करून श्रीनगरच्या तुरुंगात नेण्यात आले. डॉ. मुखर्जी हे ब्रिटिश निघून जाण्यापूर्वीच्या चाचा नेहरूंच्या सर्वपक्षीय सरकारमध्ये मंत्री होते. ते श्रीनगरच्या तुरुंगात असताना नेहरू त्यांना भारतापेक्षाही प्यारा असलेल्या जम्मू-काश्मीरचा पंतप्रधान शेख अब्दुल्ला याला भेटायला श्रीनगरला गेले होते. मंत्रीमंडळातला आपला माजी



पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत हत्या झालेल्या ३२१ भाजपा कार्यकर्त्यांच्या नावाचा फलक कोलकाता येथे उभारण्यात आला आहे. या कार्यकर्त्यांच्या बलिदानामुळे ममता बॅनर्जींची जुलमी राजवट मतदारांनी उलथवून टाकली.

सहकारीच नव्हे; तर देशाच्या विरोधी पक्षाचा एक प्रमुख नेता श्रीनगरच्या तुरुंगात आहे, त्याच्या सुटकेसाठी काही प्रयत्न न करण्याइतके आपण निलाजरे आहोतच; किमान त्यांना भेटून त्यांची ख्यालीखुशाली विचारावी असे काही या सुसंस्कृत चाचाला वाटले नाही. माणूस म्हणून चाचा काय आहे, हे मला चांगले माहित आहे. ते तुम्हाला सुखरूप परत येऊ देणार नाहीत, असा इशारा सुचेता कृपलानी (मजुमदार) यांनी श्यामाप्रसादांना दिला होता. मात्र, आपण तत्त्वासाठी तिथे जात आहोत आणि आपले चाचाशी काही वैर ना, ही असे सांगत श्यामाप्रसादांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. नेहरूने श्रीनगरला भेट दिल्याच्या तीस दिवसानंतर डॉ. मुखर्जी यांचे अतिशय संशयास्पद स्थितीत 'निधन' झाले. ते सुमारे दीड महिना तेथे कैदेत होते. त्या आंदोलनाच्यावेळी श्यामाप्रसादांबरोबर असलेल्या माखनलाल यांनी १९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यावर बंगालच्या उत्तर भागामध्ये भाजपचा प्रसार होण्यासाठी कम्युनिस्टांचा विरोध पत्करून मोठे प्रयत्न केले होते. आधी काँग्रेसचे, नंतर कम्युनिस्टांचे आणि अलीकडे तृणमूलचे गुंडदेखील माखनलाल कोण आहेत हे जाणून होते. भाजपच्या दिवंगत नेत्या सुषमा स्वराज माखनलाल यांच्या संपर्कात होत्या. मनुष्यनिर्माणाचा संघाचा यज्ञ गेली शंभर वर्षे असाच अव्याहतपणे चालू आहे. ९७ वर्षांचे माखनलाल सरकार या मनुष्यनिर्मितीपैकी एक. आज त्यांच्या आयुष्यभराच्या कार्याची अशी दखल घेतली गेली. त्यांची दखल घेणे हे एक अर्थाने खुद्द श्यामाप्रसादच आजच्या या आनंदाच्या आणि अभिमानाच्या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते असे समजायचे. भारतीय जनता पक्षाकडे असे आशीर्वाद देऊ शकणारी सज्जनशक्ती आहे, एकमेकांची काळजी घेणारी जीवाभावाची मंडळी आहेत, हा केवळ योगायोग नव्हे. आणि हे सारे देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी. नीट पहा. यांच्यापुढे देशातील कित्येक दृष्टिहीन राजकारणी आणि राजकीय पक्ष शब्दशः बेवारशी का वाटतात याचे उत्तर तुमचे तुम्हालाच मिळेल. आताचे मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी ५५ वर्षांचे आहेत. या वयात अथक संघर्ष करण्याची त्यांची क्षमता संपूर्ण देशाने पाहिली आहे. १९५२मध्ये वयाच्या (केवळ) ५१व्या वर्षी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारख्या अतिशय कर्तृत्ववान तडफदार नेत्याचे नेतृत्व देशापासून हिरावून घेतले गेले. त्यामुळे देशाचे केवढे नुकसान झाले याची कल्पनाच केलेली बरी. ■

# जंगलराज संपले

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी ते हिंदुत्ववादी नेते तपन घोष या सर्वांच्या कष्टांचे आणि असंख्य कार्यकर्त्यांच्या बलिदानाचे आणि त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाचे चिज झाले आहे. बंगालमध्ये हिंदूहित पायदळी उडवण्याची सुरुवात ममतांच्या जंगलराजपासून झाली असे नाही. १९७९ च्या सुरुवातीपासून पुढील जवळजवळ ६ महिने मरीचझापी बेटावर आश्रय मिळालेल्या लहान मुले, महिला यांच्यासह दहा हजारांपेक्षा अधिक हिंदू दलित निर्वासितांना पाण्यात विष मिसळून, गोळ्या घालून कम्युनिस्ट सरकारने ठार केले. त्यांचे मृतदेह मगरींना खाण्यासाठी फेकण्यात आले. सुसंस्कृत म्हणवणारे ज्योती बसू त्यावेळी बंगालचे मुख्यमंत्री होते. तेव्हापासून आजपर्यंत या मतुआ (नामशुद्र) हिंदूंचे भवितव्य टांगणीवर आहे. बंगालमध्ये रामाचे महत्त्व नाही, येथे फक्त दुर्गापूजा होते असे म्हणायचा उद्दामपणा तृणमूलच्या नेत्यांनी दाखवला. कोणी केवळ जय श्रीराम अशी घोषणा देतो या कारणाने अटक केली गेली. दुर्गा विसर्जनाच्या मिरवणुकांवर निर्बंध घालण्यात आले.




**२०२१** मधील विजयानंतर तृणमूलच्या गुंडांनी मारहाण, खून, आगी लावणे आणि बलात्कार करत जो हैदोस घातला, त्यावेळी सुमारे भाजपच्या ८० हजार हिंदू कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना बंगालमधून परागंदा व्हावे लागले होते.

### देदीप्यमान विजयाचे शिल्पकार

पंतप्रधान मोदी यांनी बंगालच्या मतदारांना ज्या पद्धतीने प्रेरित केले त्याला तोड नाही. त्यांचे प्रचारादरम्यान झालमुरी खाणे, गंगेमध्ये बोटीने फेरफटका मारणे हे लगेच व्हायरल झाले. बिहार निवडणुकीतील यश साजरे करण्याच्या प्रसंगी गंगा बिहारमधूनच बंगाल त्यांच्या प्रचारसभांना मिळणारा प्रतिसाद अभूतपूर्व होता. २०२१च्या अनुभवावरून यावेळी मतदारांमध्ये घराबाहेर पडून निर्भयपणे मतदानासाठी जाण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे नितांत गरजेचे होते. ते काम गृहमंत्री अमित शाह यांनी केले. कलम ३७० रद्द केल्यानंतर त्यांच्या भाषेला आलेली धार पाहण्याची ही पहिलीच वेळ होती. तृणमूलच्या गुंडांनी त्यांची गुंडगिरी न थांबवल्यास त्यांना बंगालच्या उपसागरात फेकून देऊ किंवा उलटे लटकावू अशी आक्रमक भाषा त्यांनी आपल्या भाषणांमधून वापरल्यामुळे मतदारांना मोठा मानसिक आधार मिळाला. मतदान झाल्यावर सुरक्षा दले परत गेल्यावर भाजपला मत देणाऱ्यांना कोण वाचवेल अशी खुली धमकी तृणमूलच्या गुंड नेत्यांकडून दिली गेली. खुद्द अमित शाह यांना धमक्या देण्यात आल्या. त्यांना गुंड असे म्हटले गेले. मात्र निवडणूक






संपल्यावर ८ दिवस सुरक्षादले बंगालमध्येच राहतील अशी ग्वाही शाह यांनी दिली. अशा प्रकारे ते तृणमूलला पुरून उरले. या सुरक्षा दलांच्या महिलांनी महिला मतदारांना धीर देत आश्वस्त केल्याचे व्हिडियो व्हायरल झाले. राज्यातील निवडणुकीची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवली होती ते मंगल पांडेय, भूपेंद्र यादव आणि राष्ट्रीय सरचिटणीस सुनील बन्सल यांचे या निवडणुकीची प्रत्यक्ष तयारी करण्यातील अमूल्य आहे.

गेल्या कित्येक निवडणुकांमध्ये आधी कम्युनिस्टांच्या आणि आता तृणमूलच्या दहशतीमुळे आयुष्यात एकदाही निर्भयपणे मतदान करण्याची संधी न मिळालेले मतदार बंगालमध्ये सर्वाधिक संख्येने असतील यात शंका नाही. पुरेशी सुरक्षा पुरवल्यामुळे अशांना यावेळी प्रथमच निर्भयपणे मतदान करता आले.

या विजयाचे आणखी एक महत्त्वाचे अप्रत्यक्ष शिल्पकार म्हणजे निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार. वास्तविक आयोगाचा निवडणुकीच्या परिणामाची संबंध नसतो. ज्ञानेश कुमार यांनी त्यांची प्रशासकीय कारकीर्द केरळममधून सुरू केली. आधी बिहार आणि नंतर या पाच राज्यांमधील मतदारयाद्यांची सखोल पडताळणी (एसआयआर) करण्याच्या त्यांच्या निग्रहाबाबत मल्याळी लोकांना फार आकर्षण वाटत होते. बिहार आणि नंतर बंगालमधील एसआयआर प्रक्रियेमुळे अस्वस्थ झालेल्या विरोधकांनी जंग-जंग पछाडूनदेखील ज्ञानेश कुमार यांनी त्यांना भीक घातली नाही. ते केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणे वागतात असे आरोप होऊनदेखील त्यांनी ही प्रक्रिया नेटाने पूर्ण केली. मतदानापासून ते मतमोजणीपर्यंत तृणमूलचे सर्व संभाव्य हिंसक आणि भ्रष्ट मार्ग ओळखून त्यांनी त्याविरोधात पक्की उपाययोजना केली. बंगाल पोलिस तृणमूलच्या दहशतीला सहकार्य करतात हे ओळखून त्यांना मतदान केंद्रापासून आणि मतमोजणी केंद्रांपासून दूर ठेवले गेले. निवडणूक आयोगाने मतदार याद्या स्वच्छ केल्यामुळे आणि मतदान भयमुक्त वातावरणात होतील यासाठी अपरिमित प्रयत्न केल्यामुळे हा विजय साध्य झाला.

बंगालमध्ये काँग्रेसच्या राजवटीतच राजकीय हिंसाचार सुरू झाला. निवडणुकीदरम्यान ते होणे क्रम प्राप्त होते. कम्युनिस्टांनी तो वेगळ्या पातळीवर नेला. उद्योगधंदे बंद पडत असतील तर युवकांना रोजगार कोठून मिळणार? तर जनतेकडून वसुली करून आपल्या या गुंड गँगला पोसण्याचे नवे मॉडेल कम्युनिस्टांनी उभे केले. तुम्हाला दुचाकी विकत घ्यायची असेल, घर बांधायचे असेल, घराचे नूतनीकरण करायचे असेल, नोकरी मिळवायची असेल; थोडक्यात काहीही करायचे असेल तर कम्युनिस्ट गुंड सांगतील ती रक्कम त्यांना खळखळ न करता द्यायची. निवडणूक हिंसाचार असा की हे कम्युनिस्ट केरळमधील कम्युनिस्टांना धडे देत. की तुम्ही रक्त का वाहवता हेच कळत नाही.

आम्ही राजकीय विरोधकांना जिवंत स्थितीत खड्ड्यात टाकून मिठासह पुरून टाकतो. कसलाच पुरावा मागे रहात नाही. आणि अशा या बंगाली कम्युनिस्टांचे नेते नैतिकतेच्या गप्पा मारताना दिसत. पुढे काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या ममताने कम्युनिस्टांचाच माफिया वापरून त्यांना उलथवले. लालू मुलायम यांनी प्रत्येक जिल्ह्यात एकेक स्वयंभू माफिया निर्माण केला. ममताने हे मॉडेल तालुका पातळीवर नेले. खंडणीचे मॉडेल तसेच राहिले; त्याचबरोबर दहशत हा भाग ममताने वेगळ्याच पातळीवर नेला. कम्युनिस्ट बरे वाटावेत अशी बंगालची अवस्था ममताने केली. ■

# विशेष सखोल पडताळणीद्वारे पश्चिम बंगालमधील बांगलादेशी घुसखोरांवर सर्जिकल स्ट्राईक



निवडणूक आयोगाने राबवलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी (एसआयआर SIR) मोहिमेला होणाऱ्या नाहक विरोधामुळे बंगालच्या राजकारणात आणि समाजकारणात एक पेच निर्माण झाला. ९१ लाख मतदारांची नावे एका फटक्यात यादीतून वगळली जाणे, ही केवळ प्रशासकीय दुरुस्ती नसून ती लोकशाहीच्या इतिहासातील एक मतदारयादीची सर्वात मोठी साफसफाई ठरली आहे.

**सामान्यतः** निवडणूक आयोग दरवर्षी 'समरी रिव्हिजन' करत असतो. पण एसआयआर ही प्रक्रिया त्यापेक्षा वेगळी आणि अधिक कठोर असते. यात निवडणूक अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करतात. दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित झालेले मतदार आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केलेल्या मतदारांना यादीतून बाहेर काढणे, हा त्या मागचा उद्देश आहे.

### पश्चिम बंगालमधील परिस्थिती

बांगलादेश सीमेला लागून असलेले जिल्हे आणि तिथल्या लोकसंख्या शास्त्रीय बदलांमुळे बंगालमधील मतदारयादीत मोठ्या प्रमाणात 'बोगस' नावे असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. हा आरोप खोडून काढण्यासाठी किंवा यादी


## जहाँ हुए पैदा मुखर्जी, वो बंगाल हमारा है

एकेकाळी आमची घोषणा होती जहाँ हुए बलिदान मुखर्जी, वो कश्मीर हमारा है, तीच घोषणा आज भाजपाचा कार्यकर्ता म्हणेल, जहाँ हुए पैदा मुखर्जी, वो बंगाल हमारा है. या बंगालच्या निवडणुकीचे जर खरे काही कारण असेल, तर शेवटच्या ७२ तासांत ज्या दंगली घडवून विशिष्ट मतदारांना बाहेर पडून देणे, ते यावेळी थांबवण्यात केंद्र सरकारला यश आले आणि त्या यशामुळेच निर्भय, मुक्त वातावरणात मतदान होऊ शकले. एकही मृत्यू न होता, मतदान पार पडलेले पश्चिम बंगालमधले गेल्या अनेक वर्षांतील हे मतदान आहे. आज आपण बघतो आहोत की तुष्टीकरणाची राजनीती चालणार नाही, विकासाची राजनीती चालेल, हे बंगालमध्ये सिद्ध झाले. आसाममध्ये पुन्हा एकदा भाजपाचे सरकार येत आहे. तामिळनाडूमध्ये खूपच चांगल्या पद्धतीने जागा वाढल्या आहेत. त्या ठिकाणी स्थानिक नवीन पार्टी पुढे आहे; स्वाभाविकपणे अँटी-इन्कंबन्सी दोघांमध्ये विभागली गेली आहे. पुडुचेरीमध्ये भाजप सरकार आहे. केरळमध्ये आम्ही खाते उघडतो, आमचे मतदान वाढत आहे. आजचा खरा विजय बंगालमधला जो आनंद आहे, कारण बंगाल केवळ एक राज्य नाही, तर एक सीमावर्ती प्रदेश आहे, की ज्या प्रदेशातून मुंबईपर्यंत बांगलादेशी येतात आणि आपले उद्योग-व्यवसाय बसवतात. स्थानिक तिथल्या माणसाला उद्योग-व्यवसायामध्ये तो मागे टाकतो. मला असे वाटते की या बंगालच्या विजयाने आपल्या देशाचे अनेक प्रश्न सुटणार आहेत.

**- खा . विनोद तावडे, राष्ट्रीय सरचिटणीस**

शुद्ध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली ही प्रक्रिया राबवण्यात आली. ऑक्टोबर २०२५ मध्ये पश्चिम बंगालच्या मतदार यादीत सुमारे ७.६६ कोटी मतदार होते. एप्रिल २०२६ पर्यंत हा आकडा ६.७५ कोटींवर येऊन ठेपला. म्हणजेच अवघ्या सहा महिन्यांत सुमारे १२ टक्के मतदार कमी झाले.

**पहिली पायरी (फेब्रुवारी २०२६) :** सुरुवातीच्या



टप्प्यात ६३ लाख नावे वगळण्यात आली.

**न्यायालयीन छाननी (एप्रिल २०२६) :** उर्वरित ६० लाख संशयास्पद नावांपैकी २७ लाख नावे ७ एप्रिलच्या रात्रीपर्यंत 'अपात्र' म्हणून जाहीर करण्यात आली.

एकाच राज्यातून इतक्या मोठ्या प्रमाणावर अनधिकृत मतदार कमी होणे, ही प्रशासकीय यशाची पावती मानली गेली पाहिजे. मात्र कायम घुसखोरांची बाजू घेणाऱ्या पक्षांकडून याविरुद्ध टीका आणि अपप्रचार केला गेला.

विशिष्ट जिल्हे आणि राजकीय ध्रुवीकरण- या कपातीचा सर्वाधिक फटका ज्या जिल्ह्यांना बसला आहे, त्यांचा नकाशा पाहिला तर एक विशेष पॅटर्न दिसून येतो.

- **मुर्शिदाबाद :** ४.५५ लाख नावे वगळली (सर्वात जास्त).
- **उत्तर २४ परगणा :** ३.२५ लाख नावे.
- **मालदा :** २.३९ लाख नावे.
- **कोलकाता :** ७ लाख नावे **(उत्तर आणि दक्षिण कोलकाता मिळून).**

हे जिल्हे अल्पसंख्याक बहुल किंवा सीमावर्ती आहेत. यामुळेच तृणमूल काँग्रेसने याला 'निवडणूक चोरी' म्हटले असले तरी भारतीय जनता पक्षाने 'घुसखोरीविरोधी पाऊल' म्हणून त्याचे समर्थन केले आहे. मतदारयादी हे आता केवळ प्रशासकीय दस्तावेज उरलेले नाही, तर ते घुसखोरांना उघडे पडणारे दस्तावेज ठरत आहेत. ■

# विजयाचे पडद्यामागील सूत्रधार...

जवळपास महीनाभर अमित शहा सतत बंगालमध्ये राहीले, नरेंद्र मोदींनी बंगालमध्ये विराट सभा घेतल्या. १० रुपयांची झालमुडी विकत घेऊन खाल्ली, विक्रेत्याशी बोलले, राखीव दलाचे अडीच लाख जवान बंगालमध्ये तैनात केले आणि 'एसआयआर' राबवले यामूळेच बंगालचा विजय शक्य झाला हे अर्धसत्य म्हणायला लागेल.

**प्रत्यक्ष** मैदानावर भाजपा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेविका समिती यांची फौज २०२१ नंतर आव्याहत राबत होती. त्यातल्या तीन जणांबद्दल मी आज सांगणार आहे. यांच्या प्लॅनिंगशिवाय हे अशक्य होते.

**सुनील बन्सल : (निवडणुकीची रणनिती):** उत्तर प्रदेश, तेलंगणा, ओरीसामध्ये निवडणुकीचे काम बूथ मॅनेजमेंट, कँडिडेट मॅनेजमेंट आणि प्रचार मोहिमेचे व्यवस्थापन करणारे तज्ज्ञ.... यांचे नियोजन यामागे होते. बन्सल यांनी दीडशेच्यावर बैठका घेऊन बूथ पातळीवरच्या समित्यांचे संघटन केले.

**बिप्लव कुमार देव :** त्रिपुरामध्ये भाजपासाठी ग्राउंड वर्क करणारे, शांतपणे कामे थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पद्धतीने. एवढे गोपनीय की ममता बॅनर्जीच काय भाजपाच्या स्थानिक नेत्यांनाही हे माहीत नसावे. प्रत्यक्ष जनतेत मिसळणे, त्यांची मते जाणून घेणे, भीती जाणून घेणे वगैरे सगळे यांनी सांभाळले.

**भूपेंद्र यादव (इलेक्शन स्ट्रॅटेजिस्ट) :** उत्तर प्रदेश, बिहार आणि गुजरातमध्ये निवडणुकीची जबाबदारी सांभाळली. केंद्रात पर्यावरण खाते सांभाळतात. ही व्यक्ती हाडाची निवडणूक स्पेशल आहे. थोडक्यात निवडणूकीसाठी जे काही उभारायचे त्यात प्रविण. हे सुद्धा अनेक महीने या मिशनवर कार्यरत होते. थोडक्यात टीम अशी झाली, पंतप्रधान, गृहमंत्री, हे तीन दिग्गज आणि सोबत भाजपा

### पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक मताधिक्याने विजय मिळालेली जागा कोणती?
### उत्तर : नक्षलबारी!!



| | |
|---|---|
| मताधिक्य : १०४२६५ | भाजप : १६६९०५ |
| तृणमूल काँग्रेस : ६२६४० | सीपीएम : ८५८५ |

नियमांनुसार उमेदवाराला एकूण वैध मतांच्या किमान १/६ (सुमारे १६.६७%) मते मिळाली नाहीत तर त्या उमेदवाराचे डिपॉझिट जप्त होते. नक्षलबारीमध्ये भाजपने सर्वाधिक मताधिक्याने जागा तर जिंकलीच, सीपीएमचे डिपॉझिट पण या जागेवर जप्त झाले.

**अमित शहा यांनी २०१७ मध्ये नक्षलबारीतूनच भाजप विस्तार यात्रा सुरू केली होती. यावेळी सुवेंदू अधिकारी यांनी नक्षलबारीत स्वतः जाऊन प्रचारसभा घेतल्या आणि भाजपची पकड मजबूत केली.**





बंगालची कोअर टीम. अनेक महीने एकमेकांत सुसंवाद, माहीतीची देवाणघेवाण, इनपुट्स शेअर करणे आणि त्यानुसार पुढची स्टेप ठरवणे हे सुरु होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेहमीच मिस्टर इंडिया रुपात कार्यरत असतो. यांच्यामागे पंटरांचा, सुरक्षेचा लवाजमा नसल्यामुळे हे असेच अदृष्य राहतात आणि कामे करत असतात. सेविका समिती प्रामुख्याने महिलावर्गाशी सतत संपर्कात होती. माहिती, समस्या, अपेक्षा या कलेक्ट केल्या जात होत्या. भाजपा टीम आणि बंगाल विंगने कमल मेला राबवला. यातही लोकांना भेटणे, छोट्या छोट्या नुक्कड सभा घेणे, याबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जाऊन या निमित्ताने मतदाराशी हितगुज वाढवले गेले.

### फुटबॉल हा बंगालमधला सर्वाधिक लोकप्रिय खेळ

फुटबॉल सामने सतत विविध ठिकाणी आयोजीत केल्या गेल्या वरच्या दोन्ही कार्यक्रमांच्या माध्यमातून युवावर्गाशी नाते जोडले गेले, संबंध वाढवले गेले. या सगळ्यात हिंमत फुंकली गेली. साडेबारा हजारांच्यावर नुक्कड सभा घेतल्या गेल्या अक्षरश: लाखो घरांपर्यंत टीम पोहोचली, संवाद केले गेले. उमेदवार निवडीसाठी, डॉक्टर्स, ॲडव्होकेट्स, खेळाडू तसेच काही प्रत्यक्ष पिडीत यांना तिकीटं दिली गेली. हे होईपर्यंत हे कोव्हर्ट ऑपरेशन सुरुच होते. गोष्टी एवढ्या सामान्य पद्धतीने, गाजावाजा न करता, गर्दी न करता राबवल्या गेल्या की भगवी लहर बंगालात रुजवली गेली आहे हे ममता आणि संपूर्ण टीएमसीला या गोष्टींची खबरबात लागली नाही. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर लाईमलाईटमधले बडे नेते, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, पंतप्रधान, गृहमंत्री भाजपाचे इतर बडे नेते हे उघडपणे प्रचाराला यायला लागले. बेस पक्का झाल्यानंतर. आता तुम्हाला लिंक लागेल की बंगालमध्ये कमळ खुलले कसे? फ्रंट एंडला दिसणारे हेवीवेट नेते हा उत्तरार्ध होता. आधीचे पर्व अनेक महीने सुरु होते. उगाच नाही नेत्रदिपक विजय मिळाला. नुसती फाड फाड भाषणे ठोकून, आश्वासने देऊन, नेत्यांचे चेहेरे बघून जनमत असे एकत्र येतच नसते. त्यामागे प्रचंड मेहनत घेतली गेलेली असते.

**या सगळ्यांनाच मनापासून वंदन!**

### मोदी सरकारने 'नक्षलमुक्त भारत' बनवला

नक्षलबारी हे भारताच्या राजकीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. १९६७ मध्ये येथे झालेल्या उठावातूनच 'नक्षलवादी' चळवळीची सुरुवात झाली आणि पुढे देशभरात डाव्या रक्तरंजित आंदोलनांना सुरुवात झाली. त्यामुळे नक्षलबारी हा फक्त एक विधानसभा मतदारसंघ नाही, तर भारतीय राजकारणातील एका देशविघातक विचारप्रवाहाचे उगमस्थान मानले जाते. अशा नक्षलबारी मध्ये भाजपने तब्बल एक लाखांहून अधिक मतांच्या विक्रमी फरकाने विजय मिळवणे हे राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. नक्षलबारीतून सुरू झालेला व 'तिरुपती ते पशुपती' पसरलेला नक्षलवाद संपवून मोदी सरकारने 'नक्षलमुक्त भारत' बनवला हे जेवढे मोठं कार्य आहे, तेवढाच महत्वाचा हा 'कम्युनिस्ट-मुक्त नक्षलबारी'चा विजय आहे!!

जय हिंद! **– वेद कुमार**

# ममतांना लढा देणारा झुंजार नेता



● शिवराय कुळकर्णी, प्रदेश प्रवक्ते

> पूर्वाश्रमीचे काँग्रेसी पण वैचारिक परिवर्तनानंतर प्रखर हिंदुत्ववादी म्हणून लोकप्रिय झालेल्या आसामचे प्रचंड लोकप्रिय व दबंग नेते हेमंता बिस्वासर्मा यांच्यानंतर प्रतिकुलतेवर मात करणारे दबंग नेतृत्व ही सुवेंदू अधिकारी यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

**ममता** बॅनर्जी यांच्या क्रूर आणि सुड घेऊ राजकारणाला आव्हान देत लढा देणे सोपे नव्हते. पण अत्यंत टोकाचा संघर्ष करत परिश्रमपूर्वक पश्चिम बंगालच्या राजकारणातील अत्यंत प्रभावशाली, आक्रमक आणि जनाधार असलेले नेते म्हणून सुवेंदू यांनी स्थान प्राप्त केले. २०२१ आणि २०२६ अशा दोन विधानसभा निवडणुकीत सलग ममता बॅनर्जी यांना पराभूत करण्याचा इतिहास सुवेंदू अधिकारी यांनी रचला. ममता बॅनर्जी यांचा अहंकार जिरवणारा नेता म्हणून त्यांची ओळख राष्ट्रीय स्तरावर निर्माण झाली.

ममता बॅनर्जी यांचे मुस्लिम धार्जिणे धोरण टोकाचे वाढले होते. मुस्लिमांच्या गठ्ठा मतदानासाठी घुसखुरांना खुले अभय देण्याचे तंत्र ममता बॅनर्जी यांनी वापरले. प्रामुख्याने २४ परगणा भागात बंगाली घुसखोरांना आधार कार्ड वाटून त्यांना मतदान प्रक्रियेत सामावून घेण्याची खुली योजना ममता बॅनर्जी यांनी आखली. अनुनयाचा कळस गाठला. टोकाचा हिंदू द्वेष केला. गुंडांच्या टोळ्या पोसल्या. हिंसाचाराने परिसीमा गाठली. प्रत्येक निवडणुकीनंतर विरोधकांना मारणे, जाळपोळ करणे, लुटणे, बलात्कार करणे अशा घटनांना ममतादीदींचे राजरोस समर्थन असल्याचे चित्र निर्माण झाले होते. ममता दीदींच्या स्टार प्रचारक सायोनी घोष या शिवलिंगावर



● रेखा पात्रा या संदेशखाली येथे टीएमसीच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या सामूहिक बलात्काराच्या पीडित होत्या. त्यांनी टीएमसी उमेदवाराचा ५००० हून अधिक मतांनी पराभव केला.



● रत्ना देबनाथ या आर. जी. कर रुग्णालयातील बलात्कार आणि हत्या पीडितेच्या आई आहेत. टीएमसीने गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. रत्ना यांनी टीएमसी उमेदवाराचा २८,००० हून अधिक मतांनी पराभव केला.



● कलिता माजी या एक मोलकरीण आहेत, ज्या आपला उदरनिर्वाह करण्यासाठी चार वेगवेगळ्या घरांमध्ये काम करत होत्या. भाजपला पाठिंबा दिल्यामुळे टीएमसी कार्यकर्त्यांकडून त्यांचा नियमितपणे छळ केला जात होता. त्यांनी टीएमसी उमेदवाराचा १२,००० हून अधिक मतांनी पराभव केला.

कंडोम चढवून तो फोटो व्हायरल करतात यावरून ममता बॅनर्जी गँगची विकृत मानसिकता आपल्या निदर्शनास येते. हिंदुत्वच्या विरोधात कंठशोष करणारे नेते अनुनायासाठी कोणत्या थराला जातात याची एकाहून एक सरस उदाहरणे पश्चिम बंगालच्या राजकारणात पाहायला मिळाले. मुस्लिमांचे गठ्ठा मतदान घेण्यासाठी सायोनी घोष तृणमूल काँग्रेसच्या मंचावरून मंचावरून 'हमारे दिल मे है मदिना, आखो मे है काबा' हे गीत गात होत्या. हुमायुम कबीरसारख्या कडव्या मुस्लिम नेत्याने बंगालमध्ये पुन्हा एकदा बाबरी मशिद बांधण्याचे दिलेले आव्हान हे ममतांच्या मुस्लिम अनुयायाचेच द्योतक होते.

भाजपाने पूर्वी डाव्यांच्या सरकार विरोधात आणि नंतर ममता बॅनर्जी यांच्या सरकारच्या विरोधात तीव्र संघर्ष केला. क्रमाक्रमाने हिंदुत्वाचे वातावरण तयार व्हायला लागले. ममता बॅनर्जींच्या अतिरेकाला कंटाळलेले सुवेंदू अधिकारी यांच्यासारखे चेहरे भाजपाच्या जवळ येऊ लागले. नुसतेच जवळ आले नाही तर संघर्षासाठी सिद्ध झाले. राष्ट्रीयत्वाची पूर्ण विचारधारा स्वीकारून ममता बॅनर्जी यांच्याशी थेट संघर्ष सुरू केला. हा संघर्ष सोपा नव्हता. अतिशय कठीण होता. पश्चिम बंगालमध्ये कार्यकर्त्यांचे रक्त सांडले. त्यांच्या परिवारांना त्रास झाला. अनेक महिलांची अब्रू गेली. या संपूर्ण संघर्षाच्या काळात ममतांच्या ठोकशाहीला न घाबरता खंबीरपणे उभे राहणाऱ्या नेत्यांमध्ये सुवेंदू अधिकारी हे नाव अग्रक्रमाने समोर होते. आज भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री पदासाठी सुवेंदू अधिकारी यांच्या नावाची घोषणा केली असली तरी हा विजय एकट्या सुवेंदू अधिकारी यांचा नाही. तर तो आजवर झालेल्या संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जन्मभूमीत आणि कर्मभूमीत देखील आज पहिल्यांदा कमळ फुलले आहे. ज्या भूमीने देशाला हिंदुत्वाचा मंत्र दिला, त्या भूमीत कडव्या हिंदुत्वाच्या आधारावर राष्ट्रीय पुनर्निर्माणाचा नवा अध्याय रचण्यासाठी सुवेंदू अधिकारी यांच्यासारख्या कर्मठ नेत्याचीच आवश्यकता होती. तीच लोक इच्छा देखील होती.

५६ वर्षीय सुवेंदू अधिकारी यांचे वडील शिशिर अधिकारी हे काँग्रेस आणि नंतर तृणमूल काँग्रेसमधील प्रभावी नेते होते. अधिकारी कुटुंबाचा पूर्व मेदिनीपूर भागात

मोठा राजकीय प्रभाव राहिला आहे. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून तृणमूल काँग्रेसची स्थापना केली तेव्हा अधिकारी त्यांच्यासोबत गेले आणि पक्षाच्या सुरुवातीच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली.

२००७ साली झालेले नंदीग्राम आंदोलन हे सुवेंदू अधिकारी यांच्या राजकीय आयुष्यातील टर्निंग पॉइंट मानले जाते. तत्कालीन डाव्या आघाडी सरकारने नंदीग्राम येथे विशेष आर्थिक क्षेत्रासाठी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेतला होता. सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वात या विरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. ग्रामीण भागातील जनतेला संघटित करणे आणि डाव्या सरकारविरोधात तीव्र वातावरण तयार करणे यामध्ये त्यांची भूमिका निर्णायक ठरली. नंदीग्राम आंदोलनामुळे पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीविरोधी जनमत मोठ्या प्रमाणावर वाढले आणि पुढे २०११ मध्ये ३४ वर्षांच्या डाव्या राजवटीचा अंत होण्यास मदत झाली.

२०११ मध्ये तृणमूल काँग्रेस सत्तेत आल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांना राज्यातील महत्त्वाच्या मंत्रिपदांची जबाबदारी सांभाळली.

२०१९ लोकसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढू लागले. ममता बॅनर्जी आणि त्यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांच्या मानमानीला कंटाळून सुवेंदू भाजपाकडे वळले. हा बंगालच्या राजकारणातील अत्यंत मोठा राजकीय धक्का मानला गेला. २०२१ पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत त्यांनी नंदीग्राम मतदारसंघातून थेट मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली. अत्यंत चुरशीच्या लढतीत सुवेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. हा निकाल बंगालच्या राजकारणातील मोठा राजकीय क्षण होता.

> ममता जिथे जिथे प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत असायच्या तिथे तिथे जाऊन सुवेंदू ममतांच्या १५ वर्षांच्या सत्तेची पोलखोल करीत असत. गरीबीत पिचलेल्या बंगाली लोकांना सुवेंदूच्या गोष्टी पटत होत्या. ममतांनी पोलीस यंत्रणेला टीएमसीची एक विंग बनवून टाकले होते. त्यामुळे सुवेंदू यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले. पण कलकत्ता हायकोर्ट आणि केंद्रातील भाजप सुवेंदूच्या पाठीशी असल्याने सुवेंदू मागे हटले नाहीत. ज्याप्रकारे मुकुल रॉय भाजपमधून पुन्हा टीएमसीमध्ये परतले तसे सुवेंदूच्या बाबतीत कधीच होणार नाही याचा विश्वास लोकांना पटला. रस्त्यावरच्या लढाईत सुवेंदू ममताला वरचढ ठरले. तृणमूल विरोधात मत देऊन आपल्यावर संकट येणार नाही हा विश्वास मतदारांना देण्यात सुवेंदू यशस्वी ठरले.

> पश्चिम बंगालमध्ये या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १५२ मतदारसंघांमध्ये सुमारे ९२.५९ टक्के मतदान नोंदवले गेले. राज्याच्या निवडणूक इतिहासातील ते आतापर्यंतचे सर्वोच्च मतदान आहे. या विक्रमी मतदानाचे विश्लेषण करताना राज्यातील राजकीय ध्रुवीकरण आणि मतदारांमध्ये निर्माण झालेली अस्तित्वाची भावना समजून घेणे आवश्यक आहे. तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्यातील संघर्ष या निवडणुकीत शिगेला पोहोचला होता. निवडणुकीत महिला मतदारांनी ९२.६९ टक्के मतदान करून पुरुषांना (९०.९२ टक्के) मागे टाकले, ही बाब महिलांच्या राजकीय जाणीवेचे प्रतीक मानली जाते.

त्यानंतर विरोधी पक्षनेते म्हणून सुवेंदू अधिकारी यांनी राज्य सरकारवर भ्रष्टाचार, निवडणुकीनंतरचा हिंसाचार, शिक्षक भरती घोटाळा, हिंदूंवरील अत्याचार आणि कायदा–सुव्यवस्था या मुद्द्यांवर सातत्याने आक्रमक भूमिका घेतली. विशेषतः २०२१ निवडणुकीनंतरचा हिंसाचार आणि शिक्षक भरती घोटाळ्यांवर त्यांनी राज्य सरकारला जोरदार घेरले. अनेक आंदोलने, न्यायालयीन लढाया आणि पत्रकार परिषदांमधून त्यांनी भाजपची भूमिका मांडली. सुवेंदू अधिकारी यांच्या कारकिर्दीत बंगालच्या बदलत्या राजकीय इतिहासाचे प्रतिबिंब दिसते.

सुवेंदू अधिकारी यांचे मुख्यमंत्री पदासाठी निवड झाली त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! मुख्यमंत्रीपदाचा मुकुट धारण करण्याच्या काही तास आधी त्यांच्या अतिशय जवळच्या स्वीय सहायकाचा गोळ्या घालून निर्घृण खून करण्यात आला. रक्तरंजित पश्चिम बंगालची वाट बिकट असणार! यावरून संपूर्ण देशाच्या नजरा बंगालकडे लागल्या आहेत. खूप अपेक्षा आहेत. त्यासाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा! ■

# तृणमूलची गुंडगिरी मोडून काढली

**पश्चिम** बंगालमधील निवडणुकांचा इतिहास पाहता, तेथील हिंसाचाराच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे हे निवडणूक आयोगासमोर सर्वात मोठे आव्हान होते. २०२६ च्या निवडणुकीत आयोगाने आतापर्यंतचा सर्वात कडक सुरक्षा आराखडा राबवला. पहिल्या टप्प्यातील १५२ मतदारसंघांसाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तब्बल २,४५० कंपन्या तैनात करण्यात आल्या होत्या. त्यात सुमारे एक लाख ९० हजार जवान समाविष्ट होते. या तैनात प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ मनुष्यबळ वाढवणे नव्हे, तर तंत्रज्ञानाचा सूक्ष्म वापर करणे हे होते.

निवडणूक आयोगाने पहिल्यांदाच सूक्ष्म निरीक्षक आणि केंद्रीय दलाच्या जवानांना बॉडी कॅमेऱ्यांनी सज्ज केल्याने मतदान केंद्रांवरील प्रत्येक मिनिटाची हालचाल रेकॉर्ड करणे शक्य झाले. कुठल्याही बूथवर हिंसाचाराची किंवा मतदारांना धमकावल्याची तक्रार आली, तर त्या कॅमेऱ्यांचे फुटेज पाहून त्वरित कारवाई करण्याची सोय करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, प्रत्येक संवेदनशील बूथवर एआय-सक्षम सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. त्याचे थेट प्रक्षेपण कोलकाता येथील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात आणि दिल्लीतील निवडणूक आयोगाच्या मुख्यालयातून केले जात होते. घराबाहेर पडणाऱ्या मतदारांना धमकावण्याचे प्रकार हे नित्याचेच. त्यामुळे मतदारांमधील दहशत कमी करण्यासाठी निवासी संकुलांमध्येच मतदान केंद्रे उभी करण्यात आली. त्याचाही चांगलाच परिमाण पाहायला मिळाला. सुरक्षेच्या दृष्टीने 'लक्ष्मण रेखा' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरली. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघाबाहेर पांढऱ्या खडूने ही रेषा आखण्यात आली होती. तिथे बूथ लेव्हल ऑफिसर आणि सरकारी अधिकारी मतदारांच्या ओळखपत्रांची पहिली पडताळणी करत होते. या प्रक्रियेमुळे बोगस मतदान रोखण्यात आणि मतदान केंद्राच्या प्रत्यक्ष दारापाशी होणारी गर्दी नियंत्रित करण्यात मोठे यश आले. तसेच, केंद्रीय दलाच्या वाहनांना जीपीएस ट्रॅकर्स बसवण्यात आले होते, जेणेकरून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत 'क्विक रिस्पॉन्स टीम' किती वेळात घटनास्थळी पोहोचली, याचा मागोवा घेता येईल. या तांत्रिक उपायांमुळे मतदारांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली, ज्याचा परिणाम विक्रमी मतदानात झाला.

एसआयआर ही या निवडणुकांमधील सर्वात प्रभावी ठरलेली प्रक्रिया आहे. निवडणूक आयोगाच्या मते, मतदार यादीतील 'कचरा' साफ करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, याचे परिणाम मतदानाच्या आकडेवारीवर दोनप्रकारे झाले: एक तांत्रिक आणि दुसरा मनोवैज्ञानिक.

तांत्रिकदृष्ट्या, पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली होती. मतदार यादीतील एकूण नावे कमी होतात, तेव्हा प्रत्यक्ष मतदानाची टक्केवारी नैसर्गिकरित्या वाढलेली दिसते. उदाहरणार्थ, ११० मतदार असतील आणि ८० लोकांनी मतदान केले, तर ती टक्केवारी ७२ टक्के होते; पण जर मतदार यादी दुरुस्त करून १०० केली आणि ८० लोकांनी मतदान केले, तर तीच टक्केवारी ८० टक्के दिसते. यालाच 'डिनोमिनेटर इफेक्ट' असे म्हटले जाते. पश्चिम बंगालमधील ९२ टक्के आणि तामिळनाडूतील ८५ टक्के मतदानामध्ये या गणितीय दुरुस्तीचा मोठा वाटा आहे.

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने केवळ सुरक्षेवरच लक्ष दिले नाही, तर मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी 'सिस्टमॅटिक व्होटर्स एज्युकेशन अँड इलेक्टोरल पार्टिसिपेशन' अंतर्गत अनेक उपक्रम राबवले. पश्चिम बंगालमध्ये 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान बंगालचा' या थीमखाली मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली. हावडा जिल्ह्यात सायक्लोथॉन, लोकसंगीत आणि पथनाट्यांच्या माध्यमातून तरुणांना मतदानासाठी आकर्षित करण्यात आले. तामिळनाडूमध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी आदिवासी वस्त्यांमध्ये (उदा. तिरुवल्लूरमधील थोडुकाडू आदिवासी वस्ती) जाऊन १०० टक्के मतदानाची शपथ दिली. आयोगाने दिव्यांग मतदारांसाठी आणि ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'घरातून मतदान' करण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याने मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत झाली. तसेच, तामिळनाडूमध्ये सर्वाधिक तृतीयपंथी मतदारांची नोंदणी (८,४६७) करण्यात आली. ते लोकशाहीच्या सर्वसमावेशकतेचे उदाहरण आहे. ■

# रत्ना देबनाथचा आक्रोश ममतांना भोवला...



> प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलीला डॉक्टर बनवले. आता घास तोंडाशी आला. पण ममता बॅनर्जींच्या राक्षसी मनोवृत्तीच्या राज्यात या आईच्या सुखस्वप्नांवर वरवंटा फिरवला गेला. एका क्षणात सर्व उध्वस्त झाले. डॉक्टर झालेली मुलगी आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये निवासी डॉक्टर म्हणून सेवा देत होती. सामान्य कुटुंबाला या पेक्षा अधिक काय हवे असते?

**नराधमांनी** बलात्कार करून या मुलीला यमसदनी पाठवले. आई बाप टाहो फोडत राहिले. हळू हळू समाज एकवटला. असंख्य घटना उरात दाबून ठेवलेल्या समाजमनाने संघटित आक्रोश उभा केला. पण सत्तेसाठी सबकुछ असलेल्या ममता दिदींना हा आक्रोश दिसला नाही. इकडे मुलीच्या आईने म्हणजे रत्ना देबनाथ यांनी जोपर्यंत मुलीला न्याय मिळणार नाही तोपर्यंत केस विंचरणार नाही, अशी प्रतिज्ञा घेत आधुनिक द्रौपदीचे रूप धारण केले. तर सत्तापिपासू ममता दिदींनी अन्यायाकडे डोळेझाक करण्याची डोळ्यावर पट्टी बांधून आधुनिक गांधारीची भूमिका बजावणे सुरू केले.

व्यवस्था दाद देत नाहीत म्हणून रत्ना देबनाथ हताश न होता लढत राहिल्या. पश्चिम बंगालमध्ये पहिले डाव्यांच्या राज्यव्यवस्थेत हिंसाचार टोकाला पोहचलेला. विरोधकांच्या कत्तली करून रक्तलांच्छित सिंहासनारुढ होणारी डाव्यांची राजवट आणि नंतर सत्तेसाठी देशहिताला, समाजहिताला खुंटीवर टांगणारी निर्लज्ज व अनिर्बंध ममता बॅनर्जींची राजवट. देशाचे सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या बंगालला बकाल करणारी राजवट. वंदे मातरमच्या वेदमंत्रातून वंद्य मंत्र ज्या भूमीत जन्माला आला तिथे गड्डा मतपेटीसाठी घुसखोरांना अभय मिळू लागले. इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या भूमीत राजकीय स्वार्थासाठी



स्वकीयांचे रक्त सहजतेने सांडवले गेले. दंगली प्रायोजित केल्या गेल्या. एका महिलेच्या राजवटीत मुलीबाळींना जगणे असह्य झाले. रत्ना देबनाथ यांचा लढा प्रातिनिधिक होता. रत्ना देबनाथ यांच्या रूपाने पश्चिम बंगाल दमनचक्रा विरोधात आक्रोश करीत होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, निवडणूक रणनितीचे चाणक्य केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांनी या आक्रोशाला साथ दिली. जनतेत विश्वास निर्माण केला. भयमुक्त बंगालची साद घातली आणि ममतांनी ज्या २४ परगणामध्ये मतांच्या लाचारीसाठी सर्वाधिक घुसखोरांना आधार कार्ड वाटले त्याच उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील पानिहाटी या विधानसभा मतदारसंघात रत्ना देबनाथ यांना उमेदवारी दिली. परंपरेने हा तृणमूल काँग्रेसचा बालेकिल्ला. रत्ना देबनाथ यांच्या उमेदवारीने हा बालेकिल्ला ढासळला. कालच्या भाजपाच्या ऐतिहासिक विजयात ममता बॅनर्जींचा पराभव जेवढा मनाला भावला, त्याहून कितीतरी अधिक समाधान रत्ना देबनाथ यांच्या विजयाने मिळाले.

रत्ना देबनाथ यांनी स्वेच्छेने राजकारणात प्रवेश केला नव्हता. त्या आपल्या कुटुंबासोबत आनंदात होत्या. मात्र आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये त्यांच्या मुलीसोबत झालेल्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या अमानवीय घटनेने त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण दिले. याच घटनेमुळे त्या पानिहाटीत पोहोचल्या. ज्या व्यवस्थेने



त्यांना न्यायासाठी दारावर ताटकळत ठेवले, मनस्ताप दिला, त्याच व्यवस्थेत स्थान मिळवण्याचे रत्ना देबनाथ यांचे धाडस प्रेरक आहे. स्वतःसह इतरांच्या मुलीही सुरक्षित असाव्या आणि कुणावरही अन्याय होऊ नये यासाठी त्यांनी स्वतःला व्यवस्थेचा भाग बनवले. रत्ना देबनाथ यांच्या उमेदवारीने महिला शक्ती एकवटली. विविध स्तरांतील महिलांनी त्यांना मिठी मारून, अश्रूंनी स्वागत करून त्यांच्या लढ्यात साथ दिली. या निवडणुकीत एका महिलेच्या राक्षसी सत्ताकांक्षे विरुद्ध रत्ना देबनाथ नावाची 'आई' जिंकली आहे. पश्चिम बंगालच्या महिलांनी 'अभया'ला स्वतःची मुलगी मानत या लढ्यात स्वतःला सामील करून घेतले. म्हणूनच रत्ना देबनाथ यांचा विजय लोकशाहीमध्ये सर्वात परिणामकारक आहे!

# ममता पराभूत होणे देशहितासाठी आवश्यक होते

● बांगलादेश बॉर्डरवर कुंपण घालण्यासाठी जागा संपादन करून सीमा सुरक्षा दलाकडे (BSF) द्या', हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश कचऱ्यात टाकणाऱ्या व त्यासाठी राज्याला आर्थिक दंड सोसायला लावणाऱ्या....

● देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती बंगालमध्ये आल्या असताना त्यांच्या कार्यक्रमाला अनुपस्थित राहण्याचा उद्धटपणा करणाऱ्या... त्यांच्या स्वागतालाही विमानतळावर न जाणाऱ्या...

● 'मोदींना मी पंतप्रधान मानत नाही म्हणून मी ऑनलाईन रिव्ह्यू बैठकीला उपस्थित राहणार नाही' असे जाहीरपणे म्हणणाऱ्या....

● पंतप्रधानांच्या हस्ते कोलकाता मेट्रोचे लोकार्पण होत असताना, निमंत्रण असूनही दांडी मारणाऱ्या...

● पंतप्रधान सरकारी दौऱ्यावर राज्यात आले असता त्यांच्या स्वागताला स्वतः न जाता विमानतळावर किरकोळ मंत्र्याला पाठवणाऱ्या....

● बांगलादेशी घुसखोरांना भारतातल्या विविध राज्यात सेटल करण्याचे रॅकेट चालवणाऱ्या जहांगीर खानसारख्या माणसांना पदरी बाळगणाऱ्या.....

● इतर राज्यात ड्खठ सुरळीत होत असताना बंगालमधे त्यात वारंवार बाधा उत्पन्न करणाऱ्या....

● केंद्रीय निवडणूक निरीक्षकांना सलग दहा तास ओलीस ठेवणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांना मूक पाठींबा देणाऱ्या.....

● अरेरावी वृत्तीच्या ममता बॅनर्जी यांचा पराभव होणे देशहिताच्या दृष्टीनं अत्यावश्यक होते! तो घडवून आणणाऱ्या बंगालच्या जनतेचे **हार्दिक अभिनंदन! जय बांगला!**



**● बंगाली हिंदू १५ वर्ष जवळपास एका जुलमी, अत्याचारी, मुस्लीम देशात राहील्यासारखाच होता. पूर्णपणे चिरडून पायाखाली ठेवलेला... सतत हिरवी दहशत. दुर्गा पुजा नाही, रावणदहन नाही, एवढंच काय बंगालमध्ये जय श्रीराम म्हणणे सुध्दा गुन्हा असल्यासारखे होते. पक्षाने विजय तर मिळवला पण कोणत्या परिस्थितीतून बंगाली हिंदू गेलाय हे समजून आता बधीरपणा यायला लागला. डोके सुन्न झाले कारण एकाने एक प्रसंग सांगितला.**

**● २०२१ च्या निवडणुकीनंतर भाजपाला मत दिले, प्रचार केला म्हणून एकाच्या घरात १२-१५ टीएमसीचे गुंड शिरले. सासू, सासरे, नवरा आणि दोन मुले यांना गनपॉइंटवर ठेवून त्या महिलेवर गँग रेप करण्यात आला. मुद्दाम सगळ्यांच्या समक्ष. यानंतर तिला विवस्त्र करून याच सगळ्या बलात्कारींना तशाच अवस्थेत स्वयंपाक करून जेवण वाढायला लावले.**

**● आता लोक निदान हे बोलायची तरी हिंम्मत करत आहेत, कारण बंगालमध्ये सेंट्रल रिझर्व पोलीस अजून दोन महीने तरी आहेत. अशा किती घटना अजून समोर येतील देव जाणे. आणि इथेच एकजण बोलला अत्याचार सहन करायचीही एक सिमा असते, बंगाली पिडीत आता तुटले होते, घायाळ झालेले होते आणि म्हणूनच घातकही बनले होते.**

# सोमनाथ - 'विध्वंस' ते 'सृजना'च्या प्रवासाची कहाणी


● पंतप्रधान नरेंद्र मोदी

> साम्राज्ये उभी राहिली-लयाला गेली, लाटा उसळत-विरत राहिल्या, तरीही, भारतीयांच्या मनातली 'सोमनाथ' नावाची चेतना अखंड जागीच राहिली.



**यावर्षीच्या** प्रारंभी मी सोमनाथ स्वाभिमान पर्वात सहभागी होण्यासाठी सोमनाथ येथे गेलो. सोमनाथच्या मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याचे स्मरण म्हणून हे पर्व आयोजित करण्यात आले होते. आता येत्या ११ मे रोजी मी पुन्हा सोमनाथला जाणार आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते सोमनाथच्या पुनरुज्जीवित मंदिराचे उद्घाटन करण्यात आले होते, त्या घटनेला ७५ वर्षे होत असल्याच्या निमित्ताने तिथे उत्सव होणार आहे. सहा महिन्यांच्या आत सोमनाथ मंदिराशी संबंधित दोन महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले असून, उद्ध्वस्त केलेल्या मंदिराच्या पुनरुज्जीवनाचा प्रवास म्हणजेच ज्याला आपण 'विध्वंस ते सृजन' असे म्हणतो, तसा हा प्रवास आहे. सोमनाथासमोरचा विशाल सागर कालातीत आहे. साम्राज्ये उभी राहिली आणि लयाला गेली, लाटा उसळत-विरत राहिल्या, युद्ध आणि क्रांतीच्या प्रदेशातून इतिहास आपली वाटचाल करत राहिला, तरीही, भारतीयांच्या मनातली 'सोमनाथ'नावाची चेतना अखंड जागीच राहिली.


हुकूमशाही अत्याचारांच्या विरोधात ठामपणे पाय रोवून उभ्या राहिलेल्या अनेकांचे आज स्मरण केले पाहिजे. लाकुलिशा आणि सोमा सरमन यांनी या प्रभासाचे रूपांतर तत्त्वज्ञानाच्या एका मोठ्या केंद्रात केले. वल्लभीचे चक्रवर्ती महाराज धरासेन चौथे यांनी कित्येक शतकांपूर्वी येथे दुसरे मंदिर बांधले. भीमा देवी, जयपाल आणि आनंदपाल यांनी आक्रमकांविरोधात लढून आपल्या संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन केले. राजा भोजाने मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मदत केली. कर्णदेव आणि सिद्धराजा जयसिंह यांनीही गुजरातची राजकीय आणि सांस्कृतिक ताकद पुनरुज्जीवित करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. भाव बृहस्पति, कुमारपाल, सोळंकी आणि पशुपात आचार्य यांनी या पवित्र स्थळाची पुनर्बांधणी करून तिथे पूजा-अर्चना आणि शिक्षणाचे मोठे केंद्र उभारले. विशालदेव वाघेला आणि त्रिपुरांतक यांनी येथील बौद्धिक आणि आध्यात्मिक परंपरांचे संरक्षण केले. महिपालदेव आणि रा खंगार यांनी विध्वंसानंतर पुन्हा उपासना सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अहिल्यादेवी होळकर यांनी अत्यंत प्रतिकूल काळातही भक्तीची परंपरा अखंड ठेवली. तसेच बडोद्याच्या गायकवाड यांनी यात्रेकरूंच्या हक्कांचे संरक्षण केले. आणि अर्थातच, आपल्या भूमीने हमीरजी



गोहिल आणि वेगदाजी भिल्ल यांसारख्या शूर व्यक्तिमत्त्वांना जन्म दिला, ज्यांचे बलिदान आणि शौर्य आजही सोमनाथच्या जिवंत स्मृतीचा भाग बनले आहे.

१९४०च्या दशकात, नवीन प्रजासत्ताकाचा पाया रचला जात असताना सरदार पटेल यांना एक गोष्ट मनापासून अस्वस्थ करत होती सोमनाथ मंदिराची दुरवस्था. एकदा दिवाळीचा सण असताना १३ नोव्हेंबर १९४७ रोजी, ते मंदिराच्या त्या भग्न अवशेषांजवळ उभे राहिले, आणि हाताच्या ओंजळीत समुद्राचे पाणी घेऊन म्हणाले, 'या नववर्षाच्या (गुजराती) शुभदिनी आम्ही सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी केली जावी, असा संकल्प केला आहे. सौराष्ट्रातील जनतेने, यासाठी जे शक्य आहे ते केले पाहिजे. हे एक पवित्र कार्य असून, यात सर्वांनी सहभागी व्हायला हवे.' –सरदार पटेल यांच्या त्या एका आवाहनाला केवळ गुजरातच नाही, तर संपूर्ण भारतातील जनतेने मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला.

'विकास आणि वारसा' या तत्त्वापासून प्रेरणा घेऊन, सोमनाथपासून काशीपर्यंत, कामाख्यापासून केदारनाथपर्यंत, अयोध्येपासून उज्जैनपर्यंत आणि



त्र्यंबकेश्वरपासून श्रीशैलमपर्यंत आपल्या आध्यात्मिक केंद्रांचे पारंपरिक स्वरूप टिकवून ठेवत त्यांना अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य मानतो. सोमनाथच्या रक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांना अभिवादन करण्यासाठी आणि एक हजार वर्षांच्या शौर्याचे स्मरण म्हणून, सोमनाथमध्ये पुढील एक हजार दिवस विशेष पूजा आयोजित केली जाईल. जेव्हा तुम्ही सोमनाथच्या किनाऱ्यावर उभे राहाल, तेव्हा तेथील प्राचीन प्रतिध्वनींना तुमच्याशी संवाद साधू द्या. तुम्हाला भारताच्या अजिंक्य वृत्तीचा अनुभव येईल आणि अनेक प्रयत्न होऊनही आपली संस्कृती अपराजित का राहिली, हे उमजेल. ■

# स्वयंनियमनाचे आवाहन

● अनुप देवधर

आपल्या क्रूड ऑइल आयातीचा सरासरी आकडा आहे - 5 MBPD. (Million Barrels Per Day) म्हणजे दररोज सुमारे ५० लाख बॅरल. हा आहे हा बॅरल ४२ अमेरिकन गॅलनचा असतो. १ अमेरिकन गॅलन म्हणजे साधारण आपले ३.८० लिटर. म्हणजे १ बॅरल जवळजवळ १५९ लिटर. रोजचे ५० लाख बॅरल म्हणजे जवळपास ८० कोटी लिटर क्रूड ऑइल आपल्याला रोज आयात करावे लागते आणि हे आपल्या गरजेच्या जवळपास ९०% आहे. म्हणजे आपल्या गाड्या पळवण्यापासून चुली पेटवण्यापर्यंत आपण आयातीवर अवलंबून आहोत.

**क्रूड** ऑइलची आजची किंमत १०४ डॉलर प्रति बॅरल आहे. म्हणजे आपण रोज सुमारे ५२ कोटी डॉलर्स खर्च करतो. भारतीय रुपयांत ही रक्कम रोज सुमारे ४५०० कोटी रुपयांच्या घरात जाते. म्हणजे वर्षाला १५ लाख कोटी रुपये आपला फक्त तेलाचा आयात खर्च आहे. आता या सगळ्यात कोणत्याही कारणानं क्रूड ऑइलच्या एका बॅरलची किंमत एक डॉलरने वाढली, तर आपल्याला १७००० कोटी रुपये जास्त मोजावे लागतात आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची एक रुपयाने घसरण झाली, तर १४००० कोटी रुपये जास्त लागतात. मागच्या वर्षी ६० पेक्षा कमी असणारी किंमत आज १०४ झाली आहे.




यावरून आपल्या परकीय चलनावर किती मोठा परिणाम झालाय, हे लक्षात येईल.

**आपण दरवर्षी किती सोने आयात करतो ?**

८०० टन. म्हणजे ८ लाख किलो.

**भारतात दरवर्षी सोन्याचे उत्पादन किती होते ?**

१ ते २ टन, म्हणजे फार तर २००० किलो. म्हणजे जवळपास आपण आयातीवरच अवलंबून आहोत.

**सोन्याचा जागतिक व्यापार ट्रॉय औंसमध्ये चालतो. हा एक ट्रॉय औंस म्हणजे ३१.१०३५ ग्रॅम.**

सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा दर ४७२० डॉलर्स प्रति ट्रॉय औंस आहे. म्हणजे आपण ७ लाख कोटींचे सोने दरवर्षी आयात करतो.

आपण पेट्रोल-डिझेल किंवा सोने आपल्या पैशांनी घेत असलो, तरी ब्रेटन वूड्स कॉन्फरन्स मध्ये ठरल्याप्रमाणे तेल आणि सोने या दोन्ही कमोडिटीचा आंतरराष्ट्रीय व्यापार US डॉलर मध्येच होतो, किंवा करावा लागतो. पुढे OPEC देशांना संरक्षण आणि लष्करी मदत देण्याच्या बदल्यात या तेल उत्पादक देशांना तेल डॉलर्समध्ये विकण्यासाठी अमेरिकेनं प्रवृत्त केले. याला फाटा देण्याचा छोटासा प्रयत्न इराकच्या सद्दाम हुसेन यांनी केला होता; पण त्याचा परिणाम काय झाला, हे सगळ्या जगाने बघितला आहे. रुपया घसरणे किंवा डॉलर किंमत वाढणे हे जागतिक अर्थव्यवस्था, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे व्याजदर, तेलाचे दर, युद्धस्थिती, विदेशी गुंतवणूक, व्यापाराची तूट आणि अशा असंख्य कारणांनी ठरते.

त्यामुळे आपल्याकडच्या परकीय चलनाच्या साठ्यावर सध्या मोठा परिणाम होत आहे. यापैकी आपल्या हातात जे आहे, ते करण्याचे आवाहन आपल्या पंतप्रधानांनी केले. आपल्या देशाकडे आजपर्यंत ज्या नजरेने जगाने बघितले, ती प्रतिमा आज बदलली आहे. ज्यांना आपल्या देशाची अर्थव्यवस्था घाईला आलीये असे वाटतेय त्यांनी आपल्या जागतिक व्यापारकडे बघावे. ठीगभर टॅरिफ लाऊन, डॉलरची किंमत मजबूत होऊनही आज आपला देश अमेरिकेसोबत ट्रेड सरप्लस आहे. म्हणजे आपण अमेरिकेकडून जेवढे आयात करतो, त्यापेक्षा जास्त त्यांना निर्यात करतोय.

फेब्रुवारी २०२६ मध्ये ७२८ अब्ज डॉलर असणारे परकीय चलन साठा काही महिन्यातच ६९० अब्ज डॉलरवर आला आहे. जगाचा व्यापार ज्या चलनात चालतो, त्या चलनाची किंमत वाढत आहे. ती फक्त रुपयांच्याच तुलनेत वाढतेय असे नाही, तर जगातल्या इतर चलनाच्या बाबतीतही तेच आहे.

रुपया घसरतोय म्हणून आपण सगळेच ओरडतो. त्याचे परिणामही रोज भोगतो. पण त्याची कारणे आपल्याच रोजच्या जगण्यात आहेत. पंतप्रधान मोदींनी दोन दिवसांपूर्वी तीच कारणे सांगितली. आपल्या चार सवयींनी देशाचे आणि पर्यायाने आपले भले होणार असेल, तर त्यात गैर काही नाही. यापूर्वीच्या पंतप्रधान आणि अर्थमंत्र्यांनी असे आवाहन केले होते. या आवाहनामुळे खूप काही मोठे आभाळ फाटले आहे, असे समजण्याचे कारण नाही. यापूर्वी यापेक्षाही मोठी संकटे देशावर आली, ती आपण परतवली. अर्थव्यवस्था आजही मजबूत आहेच.

पण यात सध्या राजकारण सुरू आहे. डायबेटिस होऊ नये म्हणून साखर कमी खा, असे डॉक्टर आपल्याला नेहमी सांगतात. ते आपल्याच चांगल्यासाठी असते. आमच्या पैशांनी खातो म्हणून मुद्दाम साखर खाल्ली, तर नुकसान आपलेच असते. तेलाच्या किमती वाढल्यानंतर देशावर आजवर कितीवेळा देशाचे सार्वभौमत्व संकटात येण्याइतकी गंभीर परिस्थिती उद्भवली होती हे अलीकडेच विस्ताराने लिहिले होते. युक्रेन युद्धाची तड लागलेली नसतानाच ट्रम्प या माकडाने इराणवर हल्ले सुरू केले. यावेळचा अमेरिकेचा मज असा की त्यांना काही कारणही द्यावे लागले नाही. मग कधी येथील राजवट बदलायची आहे तर कधी तिथले सम्पृक्त युरेनियम मिळवायचे आहे. कधी उघडपणे तेथील तेलावर कब्जा करायचा आहे, वगैरे वगैरे. वाटेल तसे निर्णय घेत तिकडील शेअर बाजारातून नफेखोरी करण्याच्या धंद्यांमध्ये खुद्द अमेरिकी अध्यक्षच सामील आहे.


होर्मुझ सामुद्रधुनीची इराणने नाकेबंदी केली असताही भारताला होणारा तेलाचा आणि एलएनजीचा पुरवठा जवळजवळ सुरळीत होता. एलपीजीच्या पुरवठ्यात घट झाली होती. मात्र अमेरिकेने होर्मुझ आखातातील वाहतुक नियंत्रित केल्यावर भारताला होणारा हा पुरवठा विस्कळीत झाला आहे. चीन इराणी तेलाचा फार मोठा आयातदार असल्याने हा पुरवठा खंडित होऊ नये किंवा तो बाधित होऊ नये अशी तंबी त्याने अमेरिकेला दिली होती. मात्र आता चीनचादेखील पुरवठा बाधित झालेला असू शकतो. वर उल्लेख केल्याप्रमाणे भारताला होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यात घट झाल्यावर भारत सरकारने वाहनइंधनाच्या किमती वाढवल्या नाहीत एवढेच नाही; तर त्याचे रेशनिंगदेखील केले नाही. युद्धाला तोंड फुटल्याच्या काही दिवसांनंतरच अनेक देशामध्ये अशा प्रकारच्या उपाययोजनांना सामोरे जावे लागले.

शक्य तेवढे परकी चलन वाचवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. त्यामुळे भारत ज्या वस्तूंची आयात करतो, ती आयात घटवणे गरजेचे आहे. खनिज तेल, सोने आणि खाद्यतेल हे भारतीय आयातीचे तीन प्रमुख घटक आहेत. त्यामुळे याबाबतीत सरकारने आयातीवर किंवा या घटकांच्या वापरावर निर्बंध लादण्यापेक्षा भारतीयांनी स्वयंस्फूर्तीने या साऱ्याची बचत करणे, त्यावरील खर्च कमी करणे सुरू केले तर सरकारसमोरचे आव्हान तुलनेने बरेच सोपे होते. कारण सरकारी निर्बंध आणि त्यातून निर्माण होणारी टंचाई म्हणजे या वस्तूंचा काळाबाजार सुरू होणे. एलपीजीबाबत हे झाल्याचा अनुभव अगदी अलीकडचा आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी भारतवासीयांना अंगी आर्थिक शिस्त बाळगण्याचे आवाहन केले आहे. आज हैदराबादमध्ये भाजपच्या मेळाव्यात बोलताना त्यांनी परकी चलन वाचवण्यासाठी शक्य ते उपाय योजण्याचे आवाहन केले. दररोजच्या प्रवासासाठी एकट्याने कार चालवण्याऐवजी ती शेअर करा. शक्यतो कारचा वापर जेथे शक्य तेथे टाळून मेट्रो वा अन्य सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा. जेथे शक्य आहे तेथे घरूनच काम करा. अशा स्वरूपाचे हे आवाहन आहे. ■

# आत्मनिर्भर संरक्षण प्रणालीच्या एका नव्या युगाची सुरुवात

> ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण होणे हा केवळ एका लष्करी कारवाईचा वर्धापनदिन नाही, तर ते भारताचे निर्णायक सुरक्षा धोरण, सशस्त्र दलांचे अदम्य शौर्य आणि दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेप्रती भारताच्या निःसंदिग्ध वचनबद्धतेचेही प्रतीक आहे. गेल्या एका वर्षात, या मोहिमेने केवळ देशाची सामरिक क्षमता आणि जलद प्रतिसाद देण्याची शक्तीच अधोरेखित केली नाही, तर आत्मनिर्भर संरक्षण प्रणाली, आधुनिक तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय संकल्पाच्या एका नवीन युगाचाही उद्घोष केला आहे.

**आपरेशन** सिंदूर भारताच्या संरक्षण इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय ठरला आहे. ही मोहीम लष्करी अचूकता, तिन्ही दलांमधील उत्कृष्ट समन्वय आणि प्रबळ राष्ट्रीय निर्धाराचे प्रतीक म्हणून उदयाला आली. हिमालयाच्या खडतर उंचीवरील आव्हानांना तोंड देणे असो, सागरी सीमांची सुरक्षा सुनिश्चित करणे असो, किंवा हवाई घुसखोरीचा कोणताही प्रयत्न हाणून पाडणे असो, भारताने प्रत्येक आघाडीवर आपली सज्जता, दृढनिश्चय आणि



एकता दाखवून दिली. याच दिशेने पुढे वाटचाल करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूरनंतर मिशन सुदर्शन चक्र यावर देखील वेगाने काम केले जात आहे. शत्रूकडून भारतावर होणारा कोणताही हल्ला किंवा हल्ल्याचा प्रयत्न अगदी प्राथमिक स्तरावरच हाणून पाडण्यासाठी एक मजबूत आणि आधुनिक शस्त्र सुरक्षा प्रणाली विकसित करणे, हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान, भारतीय लष्कराने दहशतवादी तळांवर हल्ला करून अनेक संकटे उधळून लावली. यात स्वदेशी अत्याधुनिक प्रणालींनी राष्ट्रीय संरक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ड्रोन युद्ध असो, बहुस्तरीय हवाई सुरक्षा असो किंवा इलेक्ट्रॉनिक युद्ध असो, ऑपरेशन सिंदूर हा लष्करी कारवायांमध्ये तंत्रज्ञान विषयक आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारताच्या प्रवासातील एक महत्त्वाचे यश होते. पाकिस्तानला पुरवण्यात आलेली चिनी हवाई संरक्षण प्रणाली भेदून भारतीय हवाई दलाने ती निकामी केली. अवघ्या २३ मिनिटांमध्ये मोहीम फत्ते करून भारताने आपल्या तंत्रज्ञान क्षमतेचे दर्शन घडवले. ऑपरेशन सिंदूरमध्ये प्रथम भारतीय लष्कराच्या कारवाईनंतर संतप्त झालेल्या पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे भारतावर हल्ला केला. अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, बठिंडा, चंदीगड आणि भुज यांसह उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय लष्कराने काउंटर-यूएएस ग्रिड या एकात्मिक मानवरहित हवाई प्रणाली आणि हवाई संरक्षण प्रणालीद्वारे हे प्रयत्न हाणून पाडले. यानंतर, प्रत्युत्तगदाखल कारवाई म्हणून ८ मे रोजी सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई सुरक्षा रडार आणि यंत्रणांना लक्ष्य केले. यानंतर, प्रत्युत्तरादाखल कारवाई करत ८ मे रोजी सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई सुरक्षा रडार आणि प्रणालींना लक्ष्य केले. लाहोरमधील एक हवाई सुरक्षा प्रणाली निष्प्रभ करण्यात आली. भारताच्या आक्रमक हल्ल्यांनी नूर खान आणि रहीमयार खान या प्रमुख पाकिस्तानी हवाई तळांना अचूकपणे लक्ष्य केले. विध्वंसक परिणामासाठी लोइटरिंग शस्त्रांचा वापर करण्यात आला, ज्यातील प्रत्येकाने शत्रूच्या रडार आणि क्षेपणास्त्र प्रणालींसह महत्त्वाच्या लक्ष्यांचा शोध घेऊन ती नष्ट केली.

> भारतात यापूर्वीही दहशतवादी घटना घडल्या आहेत, पण तेव्हा त्यांचे सूत्रधार निर्धास्त राहायचे आणि कोणत्याही भीतीशिवाय भविष्यातील हल्ल्यांचे नियोजन करायचे. आता परिस्थिती बदलली आहे. आज प्रत्येक हल्ल्यानंतर सूत्रधाराची झोप उडते, कारण त्याला माहीत आहे की भारत चोख प्रत्युत्तर देईल आणि अचूक कारवाई करून धोके नष्ट करेल. भारताने एक 'न्यू नॉर्मल' स्थापित केले आहे.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### पहलगाम हल्ल्यापासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंतची कहाणी

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममध्ये एक भीषण दहशतवादी हल्ला झाला, ज्यात २६ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा समावेश होता. घटनेनंतर गृहमंत्री अमित शाह श्रीनगरमध्ये दाखल झाले, त्यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि त्याच रात्री सुरक्षा दल व यंत्रणांसोबत बैठक घेतली आणि हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी देश सोडून पळून जाणार नाहीत याकडे लक्ष देण्याचे निर्देश दिले. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली २३ आणि ३० एप्रिल रोजी सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीची बैठक झाली.

२३ एप्रिल रोजी सर्वप्रथम सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा आणि पाकिस्तानी नागरिकांचा सार्क व्हिसा निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाकिस्तानी उच्चायुक्तालयात कार्यरत असलेल्या संरक्षण, लष्करी आणि नौदल सल्लागारांना अनावश्यक घोषित करण्यात



आले. ६ आणि ७ मे च्या रात्री भारतीय लष्कराने सीमेपलिकडील दहशतवाद्यांसह त्यांचे ९ दहशतवादी अड्डे उदध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान १२५ हून अधिक दहशतवादी ठार झाले. ७ मे च्या रात्री १ वाजून २२ मिनिटांनी भारताच्या डीजीएमओ यांनी पाकिस्तानच्या डीजीएमओला कळवले की भारताने दहशतवाद्यांच्या तळ आणि त्यांच्या मुख्यालयांवर हल्ले केले. भारताला आत्मसंरक्षणाचा अधिकार आहे. ८ मे रोजी पाकिस्तानने भारतातील निवासी भागांवर आणि लष्करी तळांवर हल्ला केला. या हल्ल्यात एका गुरुद्वाराचे नुकसान झाले, एक मंदिर उद्धवस्त झाले आणि काही नागरिक मारले गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भारतीय हवाई दलाने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देत त्याचे ११ हवाई तळ उद्ध्वस्त केले. भारताने पाकिस्तानचे हवाई तळ आणि हवाई सुरक्षा प्रणालीला लक्ष्य केले आणि त्यांची आक्रमण करण्याची क्षमताच कोलमडून टाकली. त्यानंतर पाकिस्तानकडे शरण येण्याखेरीज आणखी कोणताही मार्ग उरला नव्हता. म्हणूनच १० मे रोजी पाकिस्तानच्या डीजीएमओ यांनी भारताच्या डीजीएमओ यांना दूरध्वनी केला आणि पाच वाजता भारताने युद्ध थांबवले.

> ऑपरेशन सिंदूर दरम्यान जगाने आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, ब्रह्मोस, आकाश तीर हवाई सुरक्षा नियंत्रण प्रणाली आणि इतर स्वदेशी उपकरणांचे सामर्थ्य पाहिले. या मोहिमेच्या यशाचे श्रेय शूर सशस्त्र दलांबरोबरच नवोन्मेष, रचना आणि उत्पादन या क्षेत्रांमध्ये आघाडीवर राहून काम करणाऱ्या 'उद्योग योद्धांना' जाते.
>
> **– राजनाथ सिंह, संरक्षण मंत्री**

### ऑपरेशन महादेव

ऑपरेशन महादेवची सुरुवात २२ मे २०२५ रोजी झाली होती. २२ मे २०२५ रोजी गुप्तचर विभागाला एक खबर मिळाली होती, ज्यात दाचीगाम क्षेत्रात दहशतवादी लपले असल्याचे म्हटले होते. कडाक्याची थंडी आणि उंचावरील खडतर भागात गुप्तचर विभाग, लष्कर आणि सीआरपीएफचे अधिकारी आणि जवान त्यांचे सिग्नल मिळवण्यासाठी पायी फिरत होते. २२ जुलै रोजी सेंसरच्या माध्यमातून यश मिळाले आणि दहशतवादी तिथे असल्याला दुजोरा मिळाला. सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या जवानांनी एकत्रितपणे दहशतवाद्यांना घेरले आणि या कारवाईत पहलगाम हल्ल्यात निष्पाप नागरिकांना मारणाऱ्या तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले.

### ऑपरेशन सिंदूरमध्ये इस्त्रोचे योगदान

इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी या ऑपरेशननंतर एका कार्यक्रमात सांगितले होते की, देशातील नागरिकांची



**स्वदेशीद्वारे आत्मनिर्भर होत असलेली संरक्षण प्रणाली**

- ३८,४२४ कोटी रुपये निर्यातीची वर्ष २०२५-२०२६ मध्ये नोंद.
- ५०,००० कोटी रुपये वर्ष २०२९ पर्यंत निर्यातीचे लक्ष्य.
- १,००० कोटी रुपयांहून कमी होती १० वर्षांपूर्वी निर्यात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दहशतवाद्यांच्या म्हारेकऱ्यांना ठार केले आणि 'ऑपरेशन महादेव' मध्ये पहलगाम हल्ल्यात सहभागी दहशतवाद्यांना धूळ चारली.

**- अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**

सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ऑपरेशन दरम्यान किमान १० उपग्रह सलग २४ तास कार्यरत होते. उपग्रह आणि ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारत आपल्या ७ हजार किलोमीटरहून अधिक सागरी किनारपट्टीवर देखरेख ठेवत होता.

**३ लाख कोटी रुपयांच्या उत्पादनाचे लक्ष्य वर्ष २०२९ पर्यंत**

- १.५४ लाख कोटी रुपयांचे वित्त वर्ष २०२४-२०२५ मध्ये स्वदेशी संरक्षण उत्पादन.
- २५% वरून वाढवून पुढील तीन वर्षांमध्ये खाजगी क्षेत्रातील देशांतर्गत संरक्षण उत्पादन किमान ५०% टक्क्यापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट.

### मिशन सुदर्शन चक्र

भारताच्या आक्रमण आणि निवारण क्षमता मजबूत करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि पौराणिक वारशातून प्रेरणा घेत मिशन



## ड्रोन सामर्थ्य...
## उदयोन्मुख स्वदेशी उद्योग

भारतीय ड्रोन महासंघ (डीएफआय) ही ५५० हून अधिक ड्रोन कंपन्या आणि ५,५०० ड्रोन पायलट्सचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख उद्योग संघटना आहे. २०३० पर्यंत भारताला जागतिक ड्रोन केंद्र बनवण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. ते जगभरात भारतीय ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाच्या रचना, विकास, उत्पादन आणि निर्यातीला प्रोत्साहन देते.

## भारतीय ड्रोन बाजारपेठ

- ११ अब्ज डॉलर्सपर्यंत २०३० पर्यंत पोहोचण्याचा अंदाज.
- १२.२ % जागतिक ड्रोन बाजारपेठेत भारताचा वाटा.


सुदर्शन चक्रचा प्रारंभ केला. शत्रूंद्वारे भारतावर हल्ला करण्याचे कोणतेही प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एक शक्तिशाली शस्त्रास्त्रे प्रणाली तयार करण्यासाठी मिशन सुदर्शन चक्र सुरु करण्यात आले. ही मोहीम भारताची सामरिक स्वायत्तता बळकट करत तीव्र, अचूक आणि शक्तिशाली सुरक्षा कारवाया वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. वर्ष २०३५ पर्यंत सर्व सार्वजनिक ठिकाणांना एका विस्तारित सुरक्षा कवचद्वारे संरक्षित केले जाईल. ■

# प्रदेश समन्वयकांच्या नियुक्त्या

## प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी विभागनिहाय संघटना समन्वयकांच्या तसेच संयोजक, सहसंयोजकांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

| क्र. | पदाधिकारी | जबाबदारी |
|---|---|---|
| 1. | **मुंबई** | |
| | **श्री.राजेश पांडे,** प्रदेश सरचिटणीस | भाजपा मुंबई समन्वयक<br>प्रदेश कार्यालय समन्वयक |
| 2. | **ठाणे-कोकण** | |
| | **आ.योगेश सागर,** प्रदेश सरचिटणीस | समन्वयक |
| | **आ.प्रमोद जठार** | संयोजक |
| | **श्री.संजय वाघुले** | सहसंयोजक |
| 3. | **पश्चिम महाराष्ट्र** | |
| | **आ.निरंजन डावखरे,** प्रदेश सरचिटणीस | समन्वयक |
| | **श्री.विक्रम पावसकर** | संयोजक |
| | **श्री.विक्रम देशमुख** | सहसंयोजक |
| 4. | **उत्तर महाराष्ट्र** | |
| | **आ.माधवी नाईक,** प्रदेश सरचिटणीस | समन्वयक |
| | **श्री.विजय चौधरी** | संयोजक |
| | **आ.मंगेश चव्हाण**, प्रदेश चिटणीस | सहसंयोजक |
| 5. | **मराठवाडा** | |
| | **श्री.सुनिल राणे,** प्रदेश सरचिटणीस | समन्वयक |
| | **ॲड.नितीन काळे** | संयोजक |
| | **श्री.राहूल लोणीकर** | सहसंयोजक |
| 6. | **विदर्भ** | |
| | **आ.संजय कुटे,** प्रदेश सरचिटणीस | समन्वयक |
| | **प्रा.दिनेश सुर्यवंशी** | संयोजक |
| | **आ.प्रविण दटके** | सहसंयोजक |

## डॉ. उपेंद्र कोठेकर यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती



विदर्भातील पक्ष संघटनेची विशेष जबाबदारी

**भाजपाचे** प्रदेश अध्यक्ष मा. श्री. रविंद्र चव्हाण यांनी डॉ. उपेंद्र कोठेकर यांची प्रदेश भाजपच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती केली असून, विदर्भातील भाजपच्या संघटनात्मक कामाचे प्रमुख म्हणून विशेष जबाबदारी दिली आहे. डॉ. उपेंद्र कोठेकर गेल्या अनेक वर्षापासून विदर्भात भाजपचे संघटन मंत्री म्हणून कार्यरत आहेत. पण पक्षाच्या नवीन रचनेत त्यांना आता प्रदेश स्तरावर जबाबदारी देण्यात आली आहे.

मंत्री, अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द, राज्यात काटकसर अभियान

# मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रालयात बाईकवरून दाखल झाले, तर मंत्री नितेश राणे चालत बैठकीला आले. मंत्री गिरीश महाजन, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री आकाश फुंडकर, मंत्री जयकुमार रावल या सर्वांनीच एक ते दोन गाड्यांवरच मंत्रालयात बैठकीसाठी प्रवेश केला.

**पश्चिम** आशियात सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना ऊर्जाबचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. या अनुषंगाने शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे शासन परिपत्रक जारी करण्यात आले असून सर्व विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यात परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर, ऊर्जाबचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर दिला आहे. शासकीय अधिकाऱ्यांचे परदेश दौरे तात्पुरते रद्द केले आहेत. कारपूलिंग, सार्वजनिक वाहतूक, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल वा बसने प्रवास करण्याचे सुचविले आहे.

## ऑनलाईन प्रशिक्षण, सेमिनार भरवा; विद्यापीठे, महाविद्यालयांनाही निर्देश

● मंत्रालय, विभागीय आणि जिल्हा स्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण, सेमिनार ऑनलाईन घेण्यावर भर.

● विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ऊर्जाबचतीसाठी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा वापर, अनावश्यक दिवे व उपकरणे बंद ठेवणे; तसेच वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान ठेवण्याचे निर्देश आहेत.

● 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यावरही भर देण्यात येणार आहे.

## 'पीएनजी' गॅसचा वापरवाढवण्यावर भर; रुग्णालये, वसतिगृहांमध्ये 'मेन्यू'त बदल

● इंधनबचतीसाठी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याबरोबरच 'पीएनजी' गॅसचा वापर वाढविण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्यात येणार आहे.

● मुंबईसह मोठ्या शहरांतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्सनाही 'पीएनजी' वापरासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

● खाद्यतेलाच्या वापरात कपातीसाठी शासकीय कॅन्टीन, अंगणवाडी, रुग्णालये आणि वसतिगृहांमध्ये 'मेन्यू'त बदल केला जाणार आहे. पाम व सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा व मोहरी तेलाच्या वापराला चालना दिली जाईल. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत जनजागृतीही केली जाणार आहे.




मुंबई- एसआयआर प्रदेश कार्यशाळा- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, आशिष शेलार, जयकुमार गोरे, नितेश राणे, अतुल सावे, आकाश फुंडकर, जयकुमार रावल, प्रा. अशोक उइके हे राज्य सरकारमधील मंत्री, आ. प्रवीण दरेकर, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. माधवी नाईक, आ. योगेश सागर, सुनील राणे, माजी खासदार किरीट सोमय्या आदी.




सोलापूर- पदाधिकारी संवाद मेळावा- उपस्थिती- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ज्येष्ठ नेते राजन पाटील, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, आ. विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, मनीष देशमुख, प्रणव परिचारक, इंद्रजीत पवार, शहाजी पवार, महेश देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, सुशील क्षीरसागर आदी.




नागपूर- रोजगार व स्वयंरोजगार मेळावा- उपस्थिती- उद्योग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष प्रमोद वाकोडकर, विशेष कार्यकारी अधिकारी सुनील मित्रा, मंडल अध्यक्ष दिलीप दिवे, नगरसेवक प्रकाश गवई, प्रकाश माहुले, नगरसेविका निधी तेलगोटे, नगरसेविका अश्विनी जिचकार, किर्ती अजमेरा, नगराध्यक्ष राजा तिडके, नगरसेविका वर्षा चौधरी, लक्ष्मी यादव आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नागरिकांना आवाहन

- पुढील एक वर्ष सोने खरेदी करू नका.
- पेट्रोल, डिझेल जपून वापरा.
- परदेशी उत्पादने खरेदी करणे बंद करा.
- पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्यासाठी मेट्रोने प्रवास करा, रेल्वेने पार्सल पाठवा आणि कारचा वापर टाळा.
- खाद्य तेलाचा वापर कमी करा.
- रासायनिक खतांचा वापर निम्म्याने कमी करा आणि नैसर्गिक शेतीकडे वळा.
- परेदशी ब्रँडेड उत्पादने वापरू नका.



प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com